# महाराष्ट्र विधानपरिषद

## चौथे (हिवाळी) अधिवेशन, २०२०

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### राज्यातील तलाठ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(१) ४२२ (१८-०३-२०२०) श्री.सदाशिव खोत** : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील तलाठ्यांची पाच हजार पदे रिक्त असल्याचे माहे जानेवारी, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रिक्त पदांमुळे ७/१२ उतारा नोंदी यासह विविध कामांचा अतिरिक्त ताण कार्यरत तलाठ्यावर येत असून परिणामी शासनाच्या योजना शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यास तसेच योजनांची निगडित कामे पूर्ण होण्यास विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने राज्यातील तलाठ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री.बाळासाहेब थोरात (१०-०९-२०२०) :** (१) नाही.

(२) रिक्त असलेल्या तलाठी सजा पदांचा कार्यभार नजिकचे तलाठी सजा यांच्याकडे सोपविण्यात येवून शासनाच्या योजना, गा.न.नं.७/१२, ८-अ उतारा इत्यादी कामे पूर्ण करण्यात येत आहेत.

(३) व (४) राज्यातील तलाठी संवर्गाच्या एकूण-१८०५ रिक्त पदांकरीता महा-आयटी (महापरीक्षा पोर्टल) मार्फत दिनांक ०२/०७/२०१९ ते दिनांक २६/०७/२०१९ या कालावधीत राज्यभरातील उमेदवारांची ऑनलाईन परीक्षा घेवून पद भरतीची प्रक्रिया राबविण्यात आलेली आहे. त्यानुसार सद्य:स्थितीत राज्यातील २६ जिल्ह्यातील तलाठी पद भरतीची प्रक्रिया पूर्ण झाली असून निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्तीही देण्यात आलेली आहे. तथापि, उर्वरीत जिल्ह्यांची भरती प्रक्रिया अंतिम टप्यात असताना, दरम्यानच्या कालावधीत वित्त विभागाने दिनांक ०४ मे, २०२० च्या शासन निर्णयान्वये, “सार्वजनिक आरोग्य विभाग व वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग वगळता कोणत्याही विभागाने कोणत्याही प्रकारची नवीन पद भरती करु नये,” असे निदेश दिले आहेत. त्याप्रमाणे सदर शासन निर्णयान्वये घालण्यात आलेले पद भरतीवरील निर्बंध उठल्यावर उर्वरीत जिल्ह्यांतील अंतिम निवड झालेल्या उमेदवारांच्या नियुक्तीबाबत पुढील कार्यवाही करण्यात येईल.

---

## आदिवासी क्षेत्रातील खाजगी व्यवस्थापनाच्या शाळेतील विद्यार्थ्यांना सेवा सुविधा पुरविणेबाबत

**(२) ११७३ (१८-०३-२०२०) श्री.बाळाराम पाटील, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी क्षेत्रात खाजगी व्यवस्थापनाच्या शाळा असून या शाळेत बहुसंख्य आदिवासी विद्यार्थी आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या भागातील खाजगी व्यवस्थापनाच्या शाळेतील विद्यार्थ्यांना शासकीय आदिवासी शाळेतील मुलांप्रमाणे सेवा सुविधा दिल्या जात नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन या आदिवासी क्षेत्रातील खाजगी व्यवस्थापनाच्या शाळेतील विद्यार्थ्यांना शासकीय आदिवासी शाळेतील विद्यार्थ्यांप्रमाणे सुविधा देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड.के.सी.पाडवी (०४-११-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) हे खरे नाही.

स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविण्यात येणाऱ्या अनुदानित आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांप्रमाणे सर्व सुविधा दिल्या जातात. अनुदानित आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांच्या आहारासाठी शासनाकडून प्रती विद्यार्थी प्रती महिना रुपये १५००/- प्रमाणे परिरक्षण अनुदान मंजूर करण्यात येते. त्यामधून विद्यार्थ्यांना अल्पोपहार व भोजन देण्यात येते.

स्वयंसेवी संस्थांना शासनाकडून कर्मचाऱ्यांच्या वेतनाच्या ८ टक्के व १२ टक्के इतके वेतनेतर अनुदान देण्यात येते. त्यामधून संस्थेमार्फत विद्यार्थ्यांना गणवेश, वह्या-पुस्तके, अंथरुण-पांघरुण, ताट-वाटी, ग्लास, आंघोळीचा साबण, कपडे धुण्याचा साबण, टुथपेस्ट इ. साहित्य देण्यात येते. तसेच दोन्ही प्रकारच्या शाळांमध्ये समान मूलभूत सुविधा देण्यासंदर्भात सुधारीत आश्रमशाळा संहिता तयार करुन ती दिनांक ८ मार्च २०१९ च्या शासन आदेशान्वये लागू केली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील कोतवालांच्या मागण्यांबाबत

**(३) १३८२ (१८-०३-२०२०) श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.विक्रम काळे, श्री.अरुणकाका जगताप, श्री.बाळाराम पाटील, श्री.किशोर दराडे : तारांकित प्रश्न क्रमांक ४७८४७ ला दिनांक १८ जून, २०१९ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात १० हजारापेक्षा अधिक कोतवाल कर्मचारी असून त्यांना सध्या केवळ रुपये ७ हजार इतकी रक्कम मानधन म्हणून देण्यात येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कोतवालांना चतुर्थश्रेणी कर्मचारी म्हणून दर्जा देण्याच्या मुख्य मागणीसह अन्य मागण्या शासनाकडे अनेक वर्षापासून केल्या असून त्याबाबत मा.महसूल मंत्री यांना दिनांक १६ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास मोर्चा व आंदोलन काढून पुन्हा मागण्यांचे निवेदन देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने राज्यातील कोतवालांना चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांचा दर्जा देण्यासह इतर मागण्यांबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात (१०-०९-२०२०)** : (१) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र.बैठक-२०१६/प्र.क्र.५८१/ई-१०, दिनांक ०६/०२/२०१९ अन्वये कोतवालांना त्यांचे सेवाकालावधीनुसार मानधन देण्यात येते.
(२) होय.
(३) व (४) “कोतवाल” हे पद मानधनावरील आहे. सबब, कोतवालांना चतुर्थश्रेणी दर्जा देण्याबाबत संघटनेची मागणी अमान्य करण्यात आलेली आहे. राज्यातील कोतवाल, पोलीस पाटील, आशा वर्कर्स व अंगणवाडी सेविका या व अशा मानधनावरील कर्मचाऱ्यांचा एकत्रित विचार करुन त्यांना सामाजिक सुरक्षा प्रदान करण्याकरीता राज्य शासनाने “एकछत्र योजना” तयार करण्यासाठी अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग यांचे अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली होती. सदर समितीच्या शिफारशी लक्षात घेऊन शासन निर्णय क्र.बैठक-२०१६/प्र.क्र.५८१/ई-१०, दिनांक ०६/०२/२०१९ व शुध्दिपत्रक दिनांक ०१/०३/२०१९ नुसार कोतवालांच्या मानधनात सेवाकालावधीनुसार भरीव वाढ करण्यात आलेली आहे. तसेच महसूल विभागांतर्गत असणाऱ्या गट ‘ड’ च्या प्रथम नियुक्ती पदांपैकी नियमित पदांमधून ४०% पदे कोतवालांसाठी राखीव ठेवण्यात आलेली आहेत. त्याचप्रमाणे “राज्य शासकीय कर्मचारी समूह वैयक्तिक अपघात योजना”, “अटल निवृत्तीवेतन योजना” व “महात्मा

ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना" या योजनांचा लाभ त्या त्या योजनांमधील अटींनुसार देण्यात येऊन त्याकरीता येणारे हप्ते राज्य शासनाकडून भरण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

---

## अकोला शहरातील सिमेंट काँक्रीट रस्त्यांचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

**(४) १५८३ (१८-०३-२०२०) श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला शहरातील सहा सिमेंट काँक्रीट रस्त्यांचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत तीन यंत्रणांनी दहा महिन्यांपूर्वी दिलेल्या अहवालानुसार कार्यवाही झाली नसल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी कार्यवाही करण्यास विलंब लागण्याची कारणे काय आहेत, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तदनुसार शासनस्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अशोकराव चव्हाण (०९-११-२०२०) :** (१) हे खरे नाही.

तीन यंत्रणांनी दिलेल्या अहवालानुसार कार्यवाही करण्यात आली आहे. सदर सहा सिमेंट काँक्रीट रस्त्याच्या अहवालामध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाकडील दोन व महानगरपालिका अकोला यांचेकडील चार रस्त्यांच्या अहवालांचा समावेश आहे.

(२) सार्वजनिक बांधकाम विभागाकडील दोन रस्त्यांच्या अहवालाबाबत चौकशी केलेली आहे. दोन्ही रस्त्यांच्या नादुरुस्त झालेल्या भागाची दुरुस्ती दोष दायित्व कालावधीत संबंधित कंत्राटदाराकडून वेळेत करून घेण्यात आली आहे. सद्य:स्थितीत सदर रस्ते सुस्थितीत असून कंत्राटदाराने दुरुस्ती केलेली असल्यामुळे कंत्राटदारावर कार्यवाही करण्यात आलेली नाही.

तसेच अकोला महानगरपालिकेच्या रस्त्यांच्या अहवालाबाबत विश्वेश्र्वरैया नॅशनल इन्स्टिटट्युट ऑफ टेक्नॉलॉजी, नागपूर यांचेकडून दर्जा तपासणी करण्यात आली असून, त्यांचेकडून अहवाल प्राप्त झाल्यानंतर योग्य ती पुढील कार्यवाही महानगरपालिकेकडून करण्यात येईल.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## लातूर जिल्ह्यातील उच्चशिक्षित तरुणाने आत्महत्या केल्याबाबत

**(५) २०१३ (११-०५-२०२०) श्री.रमेशदादा पाटील, अॅड.निरंजन डावखरे, श्री.विजय उर्फ भाई गिरकर, श्री.सुजितसिंह ठाकूर :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लातूर जिल्ह्यातील सहदेव लक्ष्मण महांडुळे या उच्चशिक्षित तरुणाने महादेव कोळी जमातीचे जात प्रमाणपत्र मिळण्यास कायदेशीर प्रयत्न करून देखील अडचणी येत असल्याने माहे जानेवारी, २०२० च्या प्रथम सप्ताहात आत्महत्या केल्याची घटना घडली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सहदेव लक्ष्मण महांडुळे यांच्या वडिलांचे अधिकृत जात प्रमाणपत्र असताना औरंगाबाद जात पडताळणी समितीने सहदेव लक्ष्मण महांडुळे यांचे जात प्रमाणपत्र अवैध ठरविले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले तदनुसार सहदेव लक्ष्मण महांडुळे यांच्या कुटुंबियांना न्याय तसेच आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**अॅड. के.सी.पाडवी (०४-११-२०२०) :** (१) अशा आशयाची बातमी स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्द झाली होती.
(२) व (३) श्री.सहदेव लक्ष्मण महांडुळे यांनी कोळी महादेव या अनुसूचित जमातीचा दावा तपासणीचा प्रस्ताव अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, औरंगाबाद यांच्याकडे सादर केला होता. श्री.सहदेव महांडुळे यांच्या

दाव्याच्या अनुषंगाने पोलीस दक्षता पथकामार्फत शालेय व गृह चौकशी करण्यात आली असता दक्षता पथकास अर्जदाराच्या रक्तसंबंधित नातेवाईकांच्या शालेय नोंदी कोळी अशा आढळून आल्या. तसेच अर्जदाराचे वडील श्री.लक्ष्मण संभाजी महांडुळे यांनी शालेय अभिलेखातील जातीच्या नोंदी समितीपासून लपवून जात वैधता प्रमाणपत्र मिळविल्याचे आढळून आले. समितीने श्री.सहदेव लक्ष्मण महांडुळे यांच्या प्रकरणी वस्तुस्थितीदर्शक माहिती व पुरावे तपासून दिनांक ३०/०७/२०१९ रोजी अर्जदार व त्यांचे भाऊ, चुलत बहिण यांचा कोळी महादेव या अनुसूचित जमातीचा दावा अवैध घोषित केला. सदर आदेशाविरुध्द श्री.सहदेव महांडुळे व इतर यांनी मा.मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे याचिका दाखल केलेली होती. सदर याचिका प्रलंबित आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## बीड नगरपरिषदेने बसविलेले ट्रॅफीक सिग्नल सुरू करण्याबाबत

**(६) २०१९ (१८-०३-२०२०) श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड नगरपरिषदेने रस्त्यावरील वाहतूक सुरळीत होवून अपघात होऊ नये याकरीता बसविलेले ट्रॅफीक सिग्नल अद्यापपर्यंत सुरू करण्यात आले नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ट्रॅफीक सिग्नल बीड नगरपालिकेने कोणत्या वर्षात बसविले असून त्याकरीता किती निधी खर्च करण्यात आला आहे,

(३) असल्यास, अनेक संघटनांनी ट्रॅफीक सिग्नल सुरू करावे म्हणून सातत्याने पाठपुरावा करुन देखील शासनाचे याकडे दुर्लक्ष झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार सदर ट्रॅफीक सिग्नल सुरू करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०२-११-२०२०) :** (१) हे खरे नाही.

(२) बीड नगरपरिषदेमार्फत सन २०१२-२०१३ मध्ये ट्रॅफिक सिग्नल बसविण्यात आले असून, त्यावर रुपये १०.५३ लक्ष इतका निधी खर्च करण्यात आला आहे.

(३) हे खरे नाही.

(४) सद्य:स्थितीत बीड शहरात सिग्नल यंत्रणा सुरु करण्यात आली असून, वाहतूक व्यवस्था सुरळीत ठेवण्याच्या हेतूने पोलीस निरीक्षक वाहतूक शाखा बीड यांच्याकडे सदर सिग्नल यंत्रणा हस्तांतरीत करण्यात आली असल्याबाबत जिल्हाधिकारी, बीड यांनी अहवाल सादर केला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शिवडी-वरळी येथील उन्नत मार्गाकरीता झाडांची कत्तल होत असल्याबाबत

**(७) २०८१ (१८-०३-२०२०) श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातर्फे (एमएमआरडीए) शिवडी-वरळी या ४.५ किमीच्या उन्नत मार्गाकरीता झाडे तोडण्यात येणार असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान घेण्यात आलेल्या जनसुनावणीच्या वेळी निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकल्पांतर्गत किती झाडे तोडण्यात येणार आहेत, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व त्याबाबत शासनाची भूमिका काय आहे ?

**श्री.एकनाथ शिंदे (२८-१०-२०२०) :** (१) व (२) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत शिवडी-वरळी उन्नतमार्ग प्रकल्पाकरीता दिनांक ७ जानेवारी, २०२० रोजी घेतलेल्या जनसुनावणीच्या वेळी प्रकल्पाकरीता किती वृक्षतोड करण्यात येणार आहे असा प्रश्न उपस्थित नागरिकांनी विचारला होता.

सदर प्रकल्पासाठी कंत्राटदाराच्या स्वत:च्या संकल्पचित्रावर आधारित ठोक किंमतीच्या निविदा मागविण्यात आल्या असून सदर निविदा प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. कंत्राटदाराने तयार केलेल्या संकल्पचित्रानुसार प्रकल्पासाठी वृक्षतोड करणे आवश्यक असल्यास सक्षम प्राधिकरणाकडून योग्य त्या परवानग्या प्राप्त करून आवश्यक कार्यवाही करण्यात येईल.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## जामली (ता.चिखलदरा, जि.अमरावती) येथील आदिवासी आश्रमशाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्याचा मृत्यू झाल्याबाबत

**(८) २१४३ (१८-०३-२०२०) श्री.सुजितसिंह ठाकूर :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जामली (ता.चिखलदरा, जि.अमरावती) येथील आदिवासी आश्रमशाळेतील आठव्या वर्गात शिकणाऱ्या विद्यार्थ्याचा तापामुळे मृत्यू झाल्याची घटना माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान घडली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने शासनस्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी (०४-११-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) अनुदानित आश्रमशाळा जामली (आर) ता.चिखलदरा, जि.अमरावती या आश्रमशाळेतील इयत्ता ८ वी तील विद्यार्थी सुभाष सोमाजी धिकार याचे दिनांक ०४/०१/२०२० रोजी डोके दुखत असल्यामुळे त्याला आरोग्य उपकेंद्र जामली येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले. त्यानंतर त्याला

दिनांक ०५/०१/२०२० रोजी प्राथमिक आरोग्य केंद्र टेम्ब्रुसोंडा येथे उपचारासाठी दाखल केले. तेथील वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या सुचनेवरुन उपजिल्हा रुग्णालय, अचलपूर येथे हलविण्यात आले. परंतु प्रकृतीत सुधारणा न झाल्याने त्यास दिनांक ०७/०१/२०२० रोजी सामान्य रुग्णालय, अमरावती येथील अतिदक्षता विभागात हलविण्यात आले. तेथेही प्रकृतीत सुधारणा न झाल्याने दिनांक ०८/०१/२०२० रोजी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर येथे दाखल करण्यात आले. दरम्यान दिनांक १०/०१/२०२० रोजी शासकीय महाविद्यालय, नागपूर येथे उपचारा दरम्यान सदर विद्यार्थ्याचा मृत्यू झाला.

सदर मृत्यूप्रकरणी आश्रमशाळेचे माध्यमिक मुख्याध्यापक व वर्गशिक्षक यांना जबाबदार धरुन निलंबित करण्यात आले. परंतु विभागीय चौकशीमध्ये सदर कर्मचारी निर्दोष असल्याचे निष्पन्न झाले. सदर विद्यार्थ्यांच्या पालकांना संस्थेतर्फे रुपये ०१.०० लक्ष व शासनातर्फे रुपये ०१.०० लक्ष असे एकूण रुपये ०२.०० लक्ष सानुग्रह अनुदान अदा करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## लातूर शहराला उजणी जलाशयातून पाणीपुरवठा करण्याबाबत

**(९) २८८३ (२९-०५-२०२०) श्री.विक्रम काळे, श्री.बाळाराम पाटील, डॉ.सुधीर तांबे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी : तारांकित प्रश्न क्रमांक २४४ ला दिनांक २६ फेब्रुवारी, २०२० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर शहराला उजणी जलाशयातून पाणीपुरवठा करण्यासाठी नवीन योजना मंजूर करण्याबाबत शासनस्तरावरुन कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसल्याचे माहे मे, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे व त्याचे स्वरुप काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१२-११-२०२०) :** (१), (२) व (३) लातूर शहरास सद्य:स्थितीत मांजरा धरण या स्त्रोतावरुन पाणीपुरवठा करण्यात येत आहे.

लातूर शहरास अधिक शाश्वत स्त्रोतावरुन पाणीपुरवठा करण्याच्या हेतूने उजनी धरण व माजलगाव धरण या दोन स्त्रोतावरुन पाणीपुरवठा करण्याबाबतची व्यवहार्यता तपासण्याच्या सूचना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास देण्यात आल्या होत्या.

त्यानुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने लातूर शहरास पाणीपुरवठा करण्यासाठी उजनी जलाशय उद्भव गृहीत धरुन योजनेची प्राथमिक आखणी केली असून, ढोबळ अंदाजपत्रक तांत्रिक व सविस्तर तपासणीसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मध्यवर्ती कार्यालयाकडे सादर करण्यात आले आहे.

सदर अंदाजपत्रकावर उपस्थित मुद्दयांची पुर्तता करण्याची कार्यवाही महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत सुरु आहे.

या योजनेची व्यवहार्यता तपासणी होताच यासंदर्भात लातूर महानगरपालिकेमार्फत पुढील आवश्यक कार्यवाही करण्यात येणार आहे.

---

## औरंगाबाद येथील जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत

**(१०) ३०२४ (०२-०६-२०२०) श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद येथील जिल्हा आरोग्य अधिकारी हे शासकीय वाहनातुन रोख रक्कम, विदेशी दारु औरंगाबादहून जालन्याकडे घेऊन जात असताना पोलिसांनी वरुडी चेक पोस्टवर सदरहू रक्कम व दारु माहे एप्रिल, २०२० मध्ये वा त्यादरम्यान जप्त केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांनी मुख्यालय सोडताना वरिष्ठांची परवानगी घेतली नसल्याचे स्पष्ट झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (०४-०९-२०२०) :** (१) व (२) होय.
(३) जिल्हा आरोग्य अधिकारी, औरंगाबाद यांच्याविरूध्द बदनापूर पोलीस स्टेशन जि.जालना येथे गु.र.क्र. १५८/२०२० दाखल करण्यात आला असून शासनाच्या दिनांक २१/०४/२०२० च्या आदेशान्वये त्यांना निलंबित करण्यात आले आहे. सदर प्रकरणी त्यांच्याविरूध्द शिस्तभंगविषयक कारवाईचा प्रस्ताव मागविण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात कोणतीही नवीन नोकर भरती तसेच कर्मचाऱ्यांची बदली न करण्याबाबत

**(११) ३१०६ (०२-०६-२०२०) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात कोरोनाच संकट लक्षात घेता कुठल्याही प्रकारची नवीन नोकर भरती तसेच कोणत्याही कर्मचाऱ्याची बदली करण्यात येणार नसल्याचे आदेश मा.उप मुख्यमंत्री यांनी दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पुढील एक वर्षापर्यंत नवीन भरती पदावर बंदी आणली असल्यास जे उमेदवार प्रतिक्षा सूचीवर आहेत व यावर्षी लागणार आहेत त्यांच्या प्रतिक्षा सूचीला मुदतवाढ देण्यात येणार आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन वाशिम जिल्हा न्यायालयातील प्रतिक्षा सूचीतील शिपाई पदावरील उमेदवारांना नोकरीत सामावून घेण्याबाबत तसेच राज्यातील इतर विभागातील प्रतिक्षा सूचीतील उमेदवार ज्यांची मुदत माहे डिसेंबर, २०२० मध्ये संपणार आहे अशा प्रतिक्षा सूचीतील उमेदवारांना मुदतवाढ देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार (०६-११-२०२०) :** (१) कोविड-१९ च्या संसर्गजन्य रोगामुळे सन २०२०-२०२१ या वित्तीय वर्षात होणाऱ्या अर्थव्यवस्थेवरील परिणामाबाबत वित्तीय उपाययोजना करण्याच्या अनुषंगाने वित्त विभाग, शासन निर्णय, दिनांक ४ मे, २०२० अन्वये कोणतीही नवीन पद भरती व बदली करण्यात येवू नये, असे निदेश देण्यात आले आहेत. तथापि, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, दिनांक ७ जुलै, २०२० व दिनांक २३ जुलै, २०२० अन्वये सन २०२०-२०२१ या आर्थिक वर्षात दिनांक १० ऑगस्ट, २०२० पर्यंत संवर्गातील कार्यरत पदांच्या १५% इतक्या मर्यादेत बदली करण्यास अनुमती देण्यात आली आहे.

(२), (३) व (४) वाशिम जिल्हा न्यायालयासाठी ५० उमेदवारांची शिपाई पदासाठी निवड व प्रतिक्षा यादी बनविण्यात आली होती. त्यामधील २२ उमेदवारांना नियुक्ती देण्यात आली. उर्वरित २८ उमेदवारांना मुदतवाढ द्यावी किंवा नाही याबाबत जिल्हा न्यायालय वाशिम यांचेकडून उच्च न्यायालयास अद्याप प्रस्ताव प्राप्त झालेला नाही.

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३२० कलम ३ (क) अन्वये महाराष्ट्र लोकसेवा आयोगास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार लोकसेवा आयोगाने कार्य-नियमावली तयार केली असून त्यानुसार स्पर्धा परीक्षेव्दारे निवड करताना परीक्षेचा निकाल जाहीर झाल्यापासून १ वर्ष किंवा सदर पदासाठी पुढील जाहिरात प्रसिध्द होईल यापैकी जे आधी घडेल त्या कालावधीसाठी प्रतिक्षा सूची ठेवण्यात येते. तसेच इतर विभागातील प्रतिक्षा सूचीच्या अनुषंगाने दिनांक १३ जून, २०१८ च्या शासन निर्णयान्वये भूतपूर्व दुय्यम सेवा निवड मंडळाच्या कक्षेतील नामनिर्देशनाच्या कोट्यातील गट-ब (अराजपत्रित) व गट-क संवर्गातील पदे सरळसेवेने भरताना अनुसरावयाची एकत्रित कार्यपध्दती विहित करण्यात आली आहे. त्यात मंत्रालयीन प्रशासकीय विभागाच्या अधिपत्याखालील जिल्हा/प्रादेशिक/राज्यस्तरीय निवड समित्यांमार्फत वरील पदे भरण्यात येतात. सदर शासन निर्णयातील परि. १३ मध्ये निवडसूचीची कालमर्यादा विशद केली आहे. तसेच या शासन निर्णयात निवडसूचीस मुदतवाढ देण्याची तरतूद नाही.

---

## ॲन्टीबॉडी चाचणीच्या नावाखाली गैरव्यवहार होत असल्याबाबत

**(१२) ३२३० (१९-०६-२०२०) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देशात जलदगतीने कोरोनाची चाचणी करण्यासाठी ॲन्टीबॉडी चाचण्यांना केंद्रीय आरोग्य विभागाने परवानगी दिली असून यासाठी इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्चने काही कंपन्यांच्या चाचणी किटलाही परवानगी दिली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या परवानगीमुळे घरातच कोरोनाची चाचणी करता येईल अशी जाहिरात करीत कोरोनाच्या ॲन्टीबॉडी चाचण्यांच्या होम स्क्रीनिंग किट विक्रीसाठी बायोन या कंपनीने जाहिराती केल्या, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आय.सी.एम.आर.ने परवानगी दिलेल्या कंपन्यांचे किट खरेदी करून ते ऑनलाईन विकण्याची तसेच ऑनलाईन प्रीबुकिंग करण्याची तयारी या कंपन्यांनी सुरु केली होती, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अशी किट सदोष असल्यामुळे डॉक्टरांच्या चिठ्ठीशिवाय चाचणी न करण्याच्या शासनाच्या सूचना असतानासुध्दा घरी चाचण्या करण्याची, किट विक्री करण्याची जाहिरात या कंपन्यांनी केली याची चौकशी करुन अशा कंपन्यांवर आळा घालण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (२८-१०-२०२०) :** (१) हे खरे आहे.

दिनांक १७ एप्रिल, २०२० च्या पत्रानुसार आय.सी.एम.आर.ने रॅपिड ॲन्टीबॉडी चाचणीस पुरक चाचणी म्हणून सर्वेक्षण हेतूने परवानगी दिली होती.

(२) रॅपिट ॲन्टीबॉडी चाचणी वैद्यकीय पर्यवेक्षणाखाली करण्याबाबत आय.सी.एम.आर.ने सुचित केले आहे. याबाबत कोणी घरगुती चाचणी म्हणून जाहिरात केल्याबाबत कोणतीही तक्रार प्राप्त नाही.

(३) हे खरे नाही.

(४) दिनांक २७ एप्रिल २०२० च्या आय.सी.एम.आर.च्या पत्रानुसार गुंगझाऊ बायोटेक आणि झुहाई लिव्हझॉन डायग्नोस्टिक या दोनही कंपन्यांच्या किट्स दोन्ही क्षेत्रिय पातळीवर पुरेशा गुणवत्तेच्या न आढळल्याने या किटसचा वापर थांबविण्याबाबतच्या सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## खाजगी रुग्णालयांनी उपचारापूर्वी कोरोनाची चाचणी सक्तीची केल्याबाबत

**(१३) ३२४६ (१९-०६-२०२०) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रुग्णालयामध्ये कोरोनाचा संसर्ग पसरू नये म्हणून खाजगी रुग्णालयांनी रुग्णांना उपचारासाठी दाखल करून घेण्यापूर्वी कोरोनाची चाचणी सक्तीची केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कोरोनाची चाचणी सध्या शासकीय रुग्णालयामध्ये उपलब्ध असली तरी कोणतीही लक्षणे नसलेल्या रुग्णाच्या चाचण्या न करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यामुळे अनेक रुग्णांना कोरोनाची चाचणी खाजगी प्रयोगशाळांमध्ये करावी लागत असून या प्रयोगशाळा अशा चाचण्याकरीता रुपये ४५००/- इतके शुल्क आकारीत असल्याने गरीब नागरिकांना अशा चाचण्या करणे परवडत नसून त्यांना वेळेवर उपचार मिळत नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन गरीब रुग्णांना खाजगी रुग्णालयात कोरोना आजारावर उपचार मिळण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (२८-१०-२०२०) :** (१) हे खरे नाही.

प्रसूतीसह इतर कोणत्याही तातडीच्या उपचारास कोरोना चाचणी करण्यासाठी विलंब करु नये असे निर्देश आय.सी.एम.आर. ने दिले आहेत.

(२) हे खरे नाही.

आय.सी.एम.आर.च्या मार्गदर्शक सूचनांनुसार राज्यात बाधित रुग्णाच्या अतिजोखमीच्या निकट सहवासितांची कोरोना चाचणी, निकट सहवासितास कोणतीही लक्षणे नसली तरी केली जाते.

(३) हे खरे नाही.

आय.सी.एम.आर.च्या पोर्टलवरील सद्य:स्थितीनुसार राज्यात ८० शासकीय प्रयोगशाळा व ७४ खाजगी प्रयोगशाळा अशा एकूण १५४ प्रयोगशाळा कोविड-१९ निदानाचे काम करत आहेत. शासकीय प्रयोगशाळांमध्ये कोरोना आजाराचे निदान मोफत केले जाते. तर खाजगी प्रयोगशाळांच्या तपासणी शुल्क दिनांक ०७/०८/२०२० च्या शासन निर्णयानुसार निर्बंध घालण्यात आले.

(४) खाजगी रुग्णालयात कोरोना संदर्भातील उपचार मोफत अथवा सवलतीच्या दरात मिळावेत यासाठी शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतले आहेत.

अ) महात्मा ज्योतिबा फुले जीवनदायी योजना अंगीकृत रुग्णालयांमध्ये राज्यातील सर्व नागरीकांना लागू केली आहेत.

ब) धर्मादाय आयुक्तांकडे नोंदणीकृत असलेल्या रुग्णालयांनी आपल्याकडे १० टक्के खाटा गरीब रुग्णांसाठी मोफत तर १० टक्के खाटा आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी सवलतीच्या दरात उपलब्ध ठेवण्याबाबत आदेशित करण्यात आल्या आहेत.

क) खाजगी रुग्णालयांनी बिल आकारतांना रुग्णांची आर्थिक पिळवणुक होणार नाही याकरीता दिनांक ३०/०४/२०२०, २१/०५/२०२० व ३१/०८/२०२० च्या अधिसूचनेनुसार दर नियंत्रण करण्यात आले आहे. तसेच पूर्वलेखा परिक्षीत देयके देणे, अतिरिक्त देयके आकारल्यास, अतिरिक्त रकमेची परतफेड करणे अन्यथा रुग्णालयावर फौजदारी कारवाईचे प्रावधान केले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

# मौजे आपटी-बोरघर (ता.दापोली, जि.रत्नागिरी) येथील ग्रामपंचायतीला अनुदान मंजूर करणेबाबत

**(१४) ३२७२ (२९-०५-२०२०) श्री.रामदास कदम :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे कळंबणी बु. ग्रुप ग्रामपंचायत (ता.दापोली, जि.रत्नागिरी) या गावाची लोकसंख्या ३००० पेक्षा जास्त असून सदर कार्यालयाचे दैनंदिन कामकाज लहान जागेमध्ये सुरु असल्याने ग्रामपंचायत इमारत बांधुन मिळणेबाबत ग्रामस्थांकडून मागणी होत आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, मौजे आपटी-बोरघर (ता.दापोली, जि.रत्नागिरी) ग्रामपंचायतीचे कार्यालय भाड्याच्या खोलीमध्ये सुरु असल्याने ग्रामपंचायत इमारत बांधुन मिळणेबाबत ग्रामस्थांकडून मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर दोन्ही ग्रामपंचायतींची इमारत बांधण्यासाठी लोकप्रतिनिधींनी अनुदान मंजूर करणेबाबत शासनाला निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दोन्ही ग्रामपंचायतींची इमारत बांधण्यासाठी अनुदान मंजूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (११-११-२०२०) :** (१) हे खरे आहे.

मौजे कळंबणी येथील ग्रामपंचायत बांधकामासाठी सन २०१३-२०१४ मध्ये जनसुविधा अंतर्गत रूपये १०.०० इतके अनुदान मंजूर करण्यात आलेले होते. परंतू, जुन्या ग्रामपंचायतीचे निर्लेखन न झाल्याने व मंजूर रक्कम कमी पडत असल्याने सदर इमारतीचे बांधकाम करण्यात आलेले नाही. जनसुविधा योजना २०१९-२०२० च्या आराखड्यामध्ये प्रस्तावित करण्यात आलेल्या सदर ग्रामपंचायतीस जिल्हा नियोजन समितीकडून मान्यता मिळालेली नाही.

(२) हे खरे आहे.

सन २०१९-२०२० मध्ये जनसुविधा योजनेंतर्गत जिल्हा नियोजन समितीकडे सदर ग्रामपंचायत बांधकामाचा प्रस्ताव पाठविलेला आहे. अद्यापि, त्यास अद्याप जिल्हा नियोजन समितीची मान्यता मिळालेली नाही.

(३) सदरचे निवेदन आढळून येत नाही.

(४) ग्रामविकास विभागाच्या दिनांक १४ फेब्रुवारी, २०२० रोजीच्या पत्रान्वये, मा.बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत बांधणी योजनेंतर्गत पात्र ग्रामपंचायतींची माहिती विहित विवरणपत्रात उपलब्ध करून देण्याबाबत संबंधित जिल्हा परिषदांना कळविण्यात आलेले आहे. सदर पात्र ग्रामपंचायतींची माहिती प्राप्त झाल्यानंतर प्रचलित धोरणानुसार, मा.बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत बांधणी योजनेंतर्गत निधीच्या उपलब्धतेनुसार, ग्रामपंचायत इमारत बांधकामास मंजुरी देण्याचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अपंगांच्या विशेष शाळा व कर्मशाळेतील शिक्षकांच्या विविध प्रश्नांबाबत

**(१५) ३३५२ (२८-०५-२०२०) श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शालेय शिक्षण विभागाप्रमाणेच विशेष शाळांचे वार्षिक वेळापत्रक, कामाचे दिवस व तास, सुट्टयांचे नियोजन आणि दैनंदिन वेळापत्रक, वेतनप्रणाली शालार्थ ऐवजी सेवार्थमध्ये हस्तांतरीत करणे, दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी कार्यशाळा वाढवाव्यात, पदवीधर शिक्षक, कला क्रीडा शिक्षक यांना पदवीधर वेतनश्रेणी लागू करणे, पदोन्नतीने मुख्याध्यापक पदी नियुक्ती करणे या मागण्या शिक्षक भारती विशेष शाळा व कर्मशाळा विभागाचे अध्यक्ष श्री.विजय साबळे यांनी केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू मागण्या पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे (०९-११-२०२०) :** (१) व (२) नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई येथील माहुल क्वारंटाईन सेंटरमधील व्यक्तींच्या विविध समस्येबाबत

**(१६) ३३५९ (२९-०५-२०२०) श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) माहुल येथील इमारत क्र. ३२, ३६ आणि ५३ मध्ये कोरोनाचे तीन रुग्ण सापडल्यानंतर सदर इमारतींना सील करून रहिवाश्यांना क्वारंटाईन करण्यात आले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर क्वारंटाईन केलेल्या रहिवाश्यांना महानगरपालिकेकडून सकस आहारा ऐवजी वडा पाव दिल्याने त्यांचा आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला असून स्वच्छतागृहात पाणी नसल्याची तक्रार तेथील रुग्णांनी करून देखील महापालिकेच्या एम पूर्व विभागाच्या अधिकाऱ्यांनी या समस्यांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२९-१०-२०२०) :** (१) व (२) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या एम/पश्चिम विभागांतर्गत येणाऱ्या एव्हरस्माईल संकुलातील इमारत क्र. ३६ मध्ये कोरोनाचे ०२ रुग्ण आढळून आले होते व त्यानुषंगाने प्रचलित धोरणानुसार सदरची इमारत सील करुन बाधित रुग्णांच्या संपर्कात आलेल्या

अतिजवळच्या व्यक्तींना घरी क्वारंटाईन करण्यात आले होते. तथापि, इमारत क्र. ३२ व ५३ मध्ये सदर कालावधीत कोणताही कोरोनाबाधित रुग्ण आढळून आलेला नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सायन रुग्णालय, मुंबई कोरोनाग्रस्त व्यक्तीवर उपचार करताना निष्काळजीपणा केल्याबाबत

**(१७) ३३७१ (०३-०६-२०२०) श्री.जयंत पाटील, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रामनिवास सिंह, श्री.रमेशदादा पाटील, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रशांत परिचारक, श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील महापालिकेच्या सायन रुग्णालयात कोरोना बाधित रुग्ण उपचार घेत असलेल्या वार्ड क्रमांक ३ मध्ये कोरोनामुळे मृत्यू झालेल्या व्यक्तींच्या मृतदेहाच्या बाजूलाच कोरोनाग्रस्त व्यक्तींवर उपचार करण्यात येत असल्याची बाब दिनांक ७ मे, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सध्या मुंबईत कोरोना रुग्णांची संख्या झपाट्याने वाढत असून डॉक्टर, नर्स आणि अन्य आरोग्य सेवकांनाही कोरोनाची बाधा त्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने नेमलेल्या चौकशी समितीने आपला चौकशी अहवाल शासनास सादर केला आहे काय, सदर अहवालानुसार दोषी आढळून आलेल्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२९-१०-२०२०) :** (१) सायन रुग्णालयात कोविड-१९ च्या उपचारादरम्यान मृत्यू होणाऱ्या कोविड बाधित रुग्णांचे मृतदेह संसर्ग टाळण्यासाठी लिकप्रुफ प्लास्टिक बॅगमध्ये निर्जंतुकीकरण करुन ठेवण्यात येतात.

मात्र मृताचे नातेवाईकांचे आगमन, पोलीस विभागाकडील ना-हरकत प्रमाणपत्र इत्यादी प्रशासकीय बाबी पूर्ण होण्यास विलंब लागला. त्यामुळे सदर मृतदेह रुग्ण कक्षामध्ये काही काळ ठेवावा लागला याची चित्रफित दिनांक ६ मे, २०२० रोजी समाजमाध्यमांवर प्रसारित झाली.

(२) मुंबईत दिनांक ३१ ऑगस्ट २०२० अखेर कोरोना रुग्ण वाढीचा दर ०.८३ टक्के होता.

आढळून आलेल्या कोरोनाबाधित रुग्णांमध्ये डॉक्टर्स, नर्स आणि यांचाही अन्य आरोग्य सेवक यांच्याही समावेश होता.

(३) सदर प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत चौकशी समिती गठित केली होती. कोविड रुग्णांच्या मृतदेहाच्याबाबतीत निश्चित करण्यात आलेल्या मानक कार्यपध्दतीनुसार कार्यवाही केली जात असल्याने कारवाईचा प्रश्न उद्भवत नाही असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात जिल्हा शल्यचिकित्सक केडर व अधीक्षकांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(१८) ३३९४ (२९-०५-२०२०) श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात जिल्हा शल्यचिकित्सक केडरच्या नियुक्तीकरीता शासनाने एक वर्षापुर्वी जेष्ठतेनुसार यादी काढली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या १२० जागा मागील ३ वर्षापासून रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अधीक्षकांची पदे भरण्यासाठी शासनाने जिल्हास्तरावर माहिती मागविली असून गुणवत्ताधारक व पात्र डॉक्टर्सना पदोन्नती देण्यास विलंब करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, गेवराई, धारूर, केज, अंबेजोगाई, माजलगांव (जि.बीड) तालुक्यातील लोखंडी सावरगाव व धानोरा इत्यादी ठिकाणी पदे रिक्त असल्याने त्यांचा कनिष्ठ डॉक्टरांवर अतिरिक्त भार पडत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, जिल्हा शल्यचिकित्सक केडर व अधीक्षकांची रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (२७-१०-२०२०) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

जिल्हा शल्य चिकित्सक संवर्गातील वैद्यकीय अधीक्षक व इतर पदे पदोन्नतीने भरण्यासाठी विचारक्षेत्रातील अधिकाऱ्यांचे गोपनीय अहवाल, जात वैधता प्रमाणपत्र, मत्ता व दायित्व, संगणक हाताळणी प्रमाणपत्र इ. माहिती मागविण्यात आली होती. त्यानुसार विभागीय पदोन्नती समितीची बैठक दिनांक ०५/०९/२०१९ रोजी आयोजित करण्यात आली. विभागीय पदोन्नती समितीने पदोन्नतीस पात्र ठरविलेल्या अधिकाऱ्यांच्या निवडसूचीस सामान्य प्रशासन विभागाची मान्यता घेऊन पदस्थापनेसह प्रस्ताव शासन मान्यतेस्तव कार्यवाहीत आहे.

(४) हे खरे नाही.

ग्रामीण रुग्णालय, माजलगांव येथील वैद्यकीय अधीक्षक हे पद भरलेले आहे. तसेच गेवराई, धारुर, केज, अंबेजोगाई (जि.बीड) तालुक्यातील लोखंडी सावरगाव व धानोरा या रुग्णालयात राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत १५-विशेषज्ञ, ३५-वैद्यकीय अधिकारी, १०-बीएएमएस अर्हताधारक वैद्यकीय अधिकारी इत्यादी पदे कंत्राटी पध्दतीने भरण्यात आली आहेत. त्यामुळे कनिष्ठ डॉक्टरांवर अतिरिक्त भार पडण्याचा प्रश्न नाही.

(५) महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट अ मधील (वेतन मॅट्रीक्स मधील वेतनस्तर एस-२३ : ६७७००-२०८७००) मधील जिल्हा शल्य चिकित्सक संवर्गातील वैद्यकीय अधीक्षकांची रिक्त पदे पदोन्नतीने भरण्याबाबतचा प्रस्ताव शासन मान्यतेस्तव कार्यवाहीत आहे.

तसेच जिल्हा शल्य चिकित्सक संवर्गातील सरळसेवेच्या वाटयाची रिक्त पदे नामनिर्देशनाने स्वतंत्र निवड मंडळामार्फत भरण्यासाठी दिनांक ०४/०९/२०१९ रोजी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली आहे. त्यानुसार

प्राप्त अर्जाची छाननी करुन अंतरिम पात्र/अपात्र उमदेवारांची यादी प्रसिध्द करण्यात आली आहे. त्यास अनुसरुन प्राप्त झालेल्या निवेदनांची छाननी करुन पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

---

## खोपोली नगरपालिका (जि.रायगड) हद्दीतील इंडिया स्टील लिमिटेड कंपनीच्या कामगारांना वेतन देण्याबाबत

**(१९) ३५०७ (२८-०५-२०२०) श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खोपोली नगरपालिका (जि.रायगड) हद्दीतील इंडिया स्टील कंपनीमध्ये सहाशेहून अधिक कायमस्वरूपी व कंत्राटी कामगार काम करीत असून या सर्व कामगारांना माहे डिसेंबर, २०१९ पासून वेतन अदा केले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव असल्याने शासनाने सर्व कामगारांचे वेतन देण्यात यावे असे निर्देश दिल्यानंतर कंपनी प्रशासनाने वेतन अदा करण्याबाबत कोणतीही उपाययोजना न केल्याने कामगारांवर उपासमारीची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कामगारांचे वेतन अदा करण्याबाबत शासनाकडून कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, कामगारांचे वेतन अदा न करणाऱ्या कंपनी प्रशासनावर शासनाकडून काय कारवाई करण्यात येणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (२४-११-२०२०) :** (१) होय, ही बाब खरी आहे.

(२) शासनाने दिनांक ३१/०३/२०२० रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार व्यवस्थापनाने कामगारांना वेतन अदा केले नाही, ही बाब खरी आहे. तथापि, कामगार आयुक्त कार्यालयाच्या मध्यस्थीने माहे डिसेंबर, २०१९ चे थकित वेतन रुपये ४९,४३,४९४/- व २५० कामगारांना प्रत्येकी रुपये ५०००/- उचल व्यवस्थापनाकडून देण्यात आलेली आहे.

(३) सदर प्रकरणी कामगार आयुक्त कार्यालयाने मध्यस्थी केल्यामुळे कामगारांना माहे डिसेंबर, २०१९ चे थकित वेतन रुपये ४९,४३,४९४/- व्यवस्थापनाने दिनांक २९/०५/२०२० व ३०/०५/२०२० रोजी अदा केलेले आहे.
(४) माहे डिसेंबर, २०१९ ते दिनांक २४/०३/२०२० या कालावधीतील कामगारांचे थकित वेतन व्यवस्थापनाने विहित वेळेत अदा न केल्याने कामगार आयुक्त कार्यालयामार्फत कंपनी व्यवस्थापनेविरुध्द वेतन प्रदान अधिनियम, १९३६ च्या तरतुदींचे उल्लंघन केल्याप्रकरणी मा.प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, खालापूर यांचे न्यायालयात दिनांक ०१/०६/२०२० रोजी खटला दाखल करण्यात आलेला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सोलापूर जिल्हयात अवकाळी पाऊस व गारपीटमुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाल्याबाबत

**(२०) ३६६० (०२-०६-२०२०) श्री.प्रशांत परिचारक :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) संपूर्ण सोलापूर जिल्हयात माहे मार्च, २०२० मध्ये वा त्यादरम्यान अवकाळी पाऊस व गारपीट झाल्याने शेतीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महसूल व कृषी विभागामार्फत याचे पंचनामे करण्यात आले असून याचा परिणाम एकूण ८७ गावातील शेतकऱ्यांवर झाला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सोलापूर जिल्हयात अवकाळी पाऊस व गारपीट झाल्याने शेतीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झालेल्या सर्व बाधित शेतकऱ्यांना शासनाकडून मदत व योग्य नुकसानभरपाई मिळण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विजय वडेट्टीवार (०२-११-२०२०) :** (१) हे खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.

प्रत्यक्षात क्षेत्रियस्तरावरून पंचनामे केल्यानंतर एकूण ३१ गावातील शेती/फळपिकांचे नुकसान झालेले आहे.
(३) कृषी विभागाकडून प्रस्ताव मागविण्यात आले आहे. प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील समाजकार्य महाविद्‌यालयास सातवा वेतन आयोग लागू करण्याबाबत

**(२१) ३६८८ (०२-०६-२०२०) श्री.सुजितसिंह ठाकूर :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील उच्च व तंत्रशिक्षण विभागामार्फत सुरू असलेल्या सर्व महाविद्‌यालयातील प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सातवा वेतन लागू होवुन वर्ष पूर्ण झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सामाजिक न्याय विभागामार्फत सुरू असलेल्या राज्यातील एकूण ५२ समाजकार्य महाविद्‌यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग लागू करण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील कृषक महाविद्‌यालय सोडून सर्व महाविद्‌यालय राज्याच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागांतर्गत येतात, परंतु समाजकार्य महाविद्‌यालयांना समाजकल्याण विभागाकडे सोपवण्यात आले असून, सदर समाजकार्य महाविद्‌यालय उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडे हस्तांतरीत न झाल्यामुळे त्यांच्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करण्यात आल्याची तक्रार सदर महाविद्‌यालयातील कर्मचाऱ्यांनी केल्याने सदर महाविद्‌यालयांना सातवा वेतन आयोग लागू करण्याबाबत शासनाची कालबध्द योजना आहे काय, तसेच सदर योजना शासन तयार करुन या कर्मचाऱ्यांना देखील सातवा वेतन आयोग लागू करणार आहे काय,

(४) असल्यास, सदर योजनेची कार्यवाही कधीपासून करण्यात येणार आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे (२४-११-२०२०) :** (१) होय.
(२) होय.
(३) व (४) सामाजिक न्याय विभागांतर्गत असलेल्या समाजकार्य महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना सातवा वेतन लागू करण्याची कार्यवाही शासनस्तरावर सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## माय ऑन एनर्जी कंपनीने नागरिकांची फसवणूक केल्याबाबत

**(२२) ३६९२ (०२-०६-२०२०) श्री.सुजितसिंह ठाकूर :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात सन २०१८-२०१९ मध्ये बायोडिझेल पंप एजन्सी देण्याच्या नावाने माय ऑन एनर्जी कंपनीने सांगली ते नागपूर दरम्यानच्या सुमारे १६८ नागरिकांना प्रत्येकी रुपये १५ लाख असे करोडो रुपयांना फसविल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कंपनीने प्रभादेवी (मुंबई) येथे कार्यालय उघडून त्या कार्यालयातून अनेक गरजूंना बायोडिझेल पंपाची एजन्सी घेण्याबद्दल एक दिवसाचे शिबिर घेऊन विविध मार्गदर्शन केले होते, सदरहू कंपनीचे कार्यालय बंद असून मालक कुठे सापडत नाही, यासाठी फसवणूक झालेल्या १६८ जणांपैकी ४१ जणांनी एकत्र येऊन सदर कंपनीविरुध्द कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नागरिकांची फसवणूक करणाऱ्या सदर कंपनीविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख (२८-१०-२०२०) :** (१) होय.

(२) व (३) पोलीस ठाणे परतुर जिल्हा जालना येथे दिनांक ३०/०८/२०१९ रोजी गु.र.नं. २२०/२०१९, कलम ४०६, ४०९, ४२०, ४६८, ४७१, १२०ब, ३४ भा.दं.वि. प्रमाणे गुन्हा दाखल आहे.

सदर गुन्हयात दिनांक ०१/०६/२०२० रोजी मा.न्यायालयात क फायनल दिले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई उपचारासाठी रुग्णाकडून अवाजवी पैसे वसुल करणाऱ्या खाजगी रुग्णालयावर कारवाई करण्याबाबत

**(२३) ३८९८ (१६-०७-२०२०) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिका प्रशासनाने कोरोना उपचारासाठी रुग्णाकडून अवाजवी पैसे उकळणाऱ्या खाजगी रुग्णालयाच्या विरोधात आलेल्या तक्रारीचा निपटारा करण्याकरीता विविध खाजगी रुग्णालयासाठी लेखापरीक्षकाची नेमणूक केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रुग्णांशी समन्वय साधण्यासाठी शासनाने पाच सनदी अधिकाऱ्यांची नियुक्ती केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने नियुक्त केलेल्या सनदी अधिकाऱ्याकडे आतापर्यंत किती तक्रारी प्राप्त झाल्या, तद्नुसार शासनाने चौकशी करुन दोषी खाजगी रुग्णालया विरोधात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२९-१०-२०२०) :** (१) व (२) शासनाने निश्चित केलेल्या दरानुसार खाजगी रुग्णालयामार्फत देयके आकारण्याबाबतच्या कार्यवाहीच्या निरीक्षणाकरीता पाच सनदी अधिकारी व एक महानगरपालिका मुख्य लेखापरिक्षक यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

(३) व (४) शासनाने नियुक्त केलेल्या सनदी अधिकाऱ्यांकडे खाजगी रुग्णालयांनी शासनाने निश्चित केलेल्या दरापेक्षा अधिक देयके आकारल्याबाबत खाजगी रुग्णालयांविरुध्द १८५ तक्रारी प्राप्त झाल्या. तथापि, अवाजवी देयकाच्या तक्रारी प्राप्त झाल्यानंतर,

- ४७ तक्रारींमध्ये रुपये ४०.०६ लाख इतक्या रकमेची सवलत देण्यात आली.
- २४ तक्रारींमध्ये रुपये २०.१९ लाख इतक्या रकमेचा परतावा देण्यात आला.
- ७४ तक्रारींमध्ये तथ्य नसल्याचे आढळून आले.

उर्वरित ४० तक्रारींवर मुख्य लेखापरिक्षकांकडून कार्यवाही सुरु असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

---

## अनुसूचित जातीमधील विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती उत्पन्न मर्यादा वाढीच्या आदेशाला स्थगिती दिल्याबाबत

**(२४) ३९३० (३१-०७-२०२०) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.रमेशदादा पाटील, श्री.सदाशिव खोत, श्री.महादेव जानकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.विनायकराव मेटे : तारांकित प्रश्न क्रमांक ४८७४५ ला दिनांक २१ जून, २०१९ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनुसूचित जातीमधील विद्यार्थ्यांना परदेशी उच्च शिक्षणासाठी देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती उत्पन्न मर्यादा वाढीच्या आदेशाला स्थगिती देण्यात आल्याचे माहे मे, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना परदेशात उच्च शिक्षण घेता यावे आणि संशोधनासाठी राज्य शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडून राजश्री शाहू महाराज परदेशी शिष्यवृत्ती देण्यात येते, मात्र सदर शिष्यवृत्ती गेल्या तीन महिन्यांपासून बंद आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाकडून विदेशी विद्यापिठांना वेळेत शिष्यवृत्तीची रक्कम मिळत नसल्याने आधीच यु.एन.एस.डब्ल्यू, सिडनी, ऑस्ट्रेलिया या विद्यापिठांनी विद्यार्थ्यांना प्रवेश नाकारले होते, त्यात काही विद्यार्थी संघटनांच्या प्रयत्नाने विद्यार्थ्यांना प्रवेश मिळाला, मात्र पुन्हा एकदा विद्यार्थ्यांना मागील ३ महिन्यांपासून शिष्यवृत्ती मिळत नसल्याने शिष्यवृत्तीवर परदेशी गेलेल्या विद्यार्थ्यांची उपासमार होत आहे, इतकेच नव्हे तर त्यांना अनेक गंभीर समस्यांना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन उक्त स्थगिती उठविण्याबाबत शासनस्तरावर सर्व समावेशक कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे तसेच शिष्यवृत्तीची रक्कम विनाविलंब मिळणेकरीता शासनस्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे (२६-१०-२०२०) :** (१) अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना परदेशात विशेष अध्ययन करण्यासाठी राजश्री शाहू महाराज शिष्यवृत्ती योजनेंतर्गत जागतिक क्रमवारीत पहिल्या १०० विद्यापीठात प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी उत्पन्नाची मर्यादा नव्हती. ही अट काढून टाकण्याचा निर्णय दिनांक ५ मे,२०२० च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला. सदर निर्णय दिनांक २१ मे, २०२० च्या शासन निर्णयान्वये स्थगित करण्यात आला आहे.

(२) व (३) हे खरे नाही, कोविड-१९ च्या प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर परदेशातील विद्यापीठ/विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती अदा करण्यास विलंब झाला, ही वस्तुस्थिती आहे. या काळात परदेशातील काही विद्यापीठे ऑनलाईन अभ्यासक्रम घेत असल्याची बाब काही विद्यार्थ्यांकडून निदर्शनास आणण्यात आली होती. शासन निर्णयानुसार ऑनलाईन अभ्यासक्रमासाठी शिष्यवृत्ती देय नव्हती. विशिष्ठ परिस्थिती विचारात घेवून, तात्काळ धोरणात बदल करुन, ऑनलाईन अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना देखील विशेष बाब म्हणून शिष्यवृत्ती अदा करण्याचा निर्णय घेता आला व त्यानुसार आयुक्तालयामार्फत शिष्यवृत्ती अदायगीची कार्यवाही करण्यात आली आहे.

मागील वर्षामध्ये यु.एन.एस.डब्ल्यू, सिडनी, ऑस्ट्रेलिया या विद्यापीठाच्या सत्र पध्दतीत अचानक बदल झाल्याने, तसेच परदेशातील चलनातील विनिमय दरातील चढ उतारामुळे विद्यापिठांना शिक्षण शुल्काची रक्कम मंजूर रक्कमेपेक्षा कमी अदा झाल्या होत्या. संबंधितांना वर्ग झालेली रक्कम व भारतीय चलनातून वर्ग झालेली रक्कम याचा ताळमेळ घेण्यास अडचणी येत असल्याने विद्यापीठाकडून खुलासे घेवून फीची रक्कम अदा करण्यात आलेली आहे. तसेच ज्या विद्यार्थ्यांचे प्रवेश विद्यापीठाने नाकारले होते, त्यांच्या प्रवेशाबाबत विद्यापिठास व त्यांच्या प्रतिनिधीस प्रत्यक्ष भेटून तसेच ई-मेलव्दारे पाठपुरावा करुन, विद्यार्थ्यांची शिक्षण फीची रक्कम आगाऊ अदा करुन विद्यार्थ्यांचे प्रवेश आयुक्तालयामार्फत निश्चित करण्यात आले.

माहे मार्च, २०२० अखेरपर्यंत खर्च विवरण व इतर आवश्यक माहिती परिपूर्ण असलेल्या सर्व विद्यार्थ्यांच्या शिक्षण फी बरोबरच निर्वाहभत्ता देखील मंजूर करुन अदा करण्यात आलेला माहे. त्याचबरोबर, माहे जून, २०२० अखेर परदेशातील विद्यापीठात प्रवेशित/शिक्षण घेत असलेल्या सर्व अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीच्या रक्कमा आयुक्तालयामार्फत मंजूर करुन विद्यापीठास वर्ग करण्यात आलेल्या आहेत.

(४) कोविड-१९ महामारीच्या पार्श्वभूमीवर वाहतूक व दळणवळण सुविधा ठप्प असल्याने व सर्व संबंधित घटकांशी चर्चा करुन निर्णय घेण्यास अवधी लागणार असल्याने, परदेश शिष्यवृत्ती योजनेंतर्गत पात्र विद्यार्थी वंचित राहू नयेत म्हणून, सन २०१९-२०२० मध्ये ज्या स्वरुपात परदेश शिष्यवृत्ती योजना राबविण्यात आली, त्याच स्वरुपात सन २०२०-२०२१ करीता परदेश शिष्यवृत्ती योजना राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच या योजनेंतर्गत शिष्यवृत्तीची रक्कम विनाविलंब अदा होण्याच्या दृष्टीने समाजकल्याण आयुक्तालयामार्फत कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## घाटकोपर-मानखुर्द लिंक रोडवरील गोदामांना भीषण आगी लागल्याबाबत

**(२५) ३९३५ (१६-०७-२०२०) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घाटकोपर-मानखुर्द लिंकरोडवरील मंडाला परिसरात असलेल्या गोदामाला दिनांक २३ जून, २०२० रोजी वा त्यासुमारास लागलेल्या भीषण आगीत पंधरा ते वीस गोदामे जळाली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गोदामात मोठ्या प्रमाणात अनधिकृतपणे ज्वलनशील पदार्थ आणि रसायनांचा साठा केला जात होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर गोदामाला आग लागण्यामागची कारणे काय आहेत, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार शासनस्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०२-११-२०२०) :** (१) घाटकोपर-मानखुर्द लिंक रोड येथील मंडाला परिसरात असलेल्या १३ विविध बैठ्या गाळ्यांमध्ये व काही गाळ्यांतील पोट माळ्यांमध्ये दिनांक २३ जून, २०२० रोजी आग लागली होती ही वस्तुस्थिती आहे.

(२) सदर ठिकाणच्या आस्थापनांचे परिक्षण केले असता, सदर ठिकाणी लाकडी फळ्या व प्लास्टिक भंगारचा साठा आणि विद्युत जोडण्या इत्यादी जळाऊ पदार्थांना आग लागल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) सदर आगीची बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत चौकशी करण्यात आली असता, सदर आगीचे संभाव्य कारण “सदोष विद्युत प्रणाली” असे आढळून आले.

तसेच, सदर परिसरात असलेल्या अनधिकृत गोदामांच्या संबंधित व्यवसायिकांवर बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ३९४/४७१ अन्वये कारवाई करुन मा.दंडाधिकारी न्यायालयात खटले दाखल करण्यात आल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात शेतकऱ्यांना पोलिसांकडून गावांमध्ये, शहरांमध्ये भाजीपाला, फळे विकण्यास अडवणूक होत असल्याबाबत

**(२६) ३९८६ (१५-०७-२०२०) श्री.सदाशिव खोत, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कोविड-१९ विषाणूच्या प्रादुर्भावामुळे लॉकडाऊनच्या (टाळेबंदी) काळात शेतकऱ्यांना पोलिसांकडून गावांमध्ये, शहरांमध्ये भाजीपाला, फळे विकण्यास अडवणूक करण्यात येत असल्याचे माहे एप्रिल, २०२० च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात कोरोनामुळे असलेले लॉकडाऊन व दुसरीकडे वादळी पाऊस अशा संकटामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे, फळ व भाजीपाल्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असताना बारामतीमध्ये (जि.पुणे) भाऊसाहेब मांडे नावाच्या एका फळ विक्रेत्या शेतकऱ्याला पोलिसांनी रिंगण करून मारहाण केल्याची घटना निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शेतकऱ्याच्या मालाचे नुकसान झाल्याप्रकरणी त्यांना नुकसान भरपाई देऊन अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांना बाजारपेठ व विक्री व्यवस्था उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख (२८-०९-२०२०) :** (१) हे खरे नाही.

लॉकडाऊनच्या काळात शेतकऱ्यांना पोलिसांकडून गावांमध्ये, शहरांमध्ये फळे विकण्यास अडवणूक होत असल्याबाबत पुणे ग्रामीण पोलीस कार्यक्षेत्रात गुन्हा दाखल नाही.

(२) हे खरे नाही.

दिनांक २०/०४/२०२० बारामती पोलीस ठाणे येथील पोलीस शिपाई बारामती शहर पोलीस स्टेशन हद्दीत कोरोना व्हायरसच्या पार्श्वभूमीवर लोक गर्दी करणार नाहीत तसेच अनावश्यक दुकाने उघडी राहणार नाहीत म्हणून गस्तीवर होते त्यावेळी जिल्हाधिकारी यांचे नियमांचे उल्लंघन करुन चारचाकी

वाहन एका जागी लावून टरबूज व फळ विक्री करीत असताना भाऊसाहेब रामदास मांडे रा.मढेवडगाव, ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर व इतर २ व्यक्ती मिळून आल्याने त्यांना हटकले असता त्यातील भाऊसाहेब रामदास मांडे याने अरेरावीचे भाषेत पोलिसांना उत्तर देण्यास सुरुवात केली व शिवीगाळ केली तसेच फिर्यादीचे गचोंडीला धरुन सरकारी शर्टची बटणे तोडून धक्काबुक्की करुन सरकारी कर्तव्यात अडथळा निर्माण केला म्हणून संचारबंदी व रोगप्रतिबंधक अधिनियमाचे उल्लंघन करुन संसर्ग पसरविण्याची हयगयीची घातक कृती केलेबाबत आरोपींचेविरुध्द बारामती शहर पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.२३९/२०२० भादंवि कलम ३५३, २६९, २७०, ३२३, ५०४, १८८ सह साथीचे रोग प्रति. अधि. १८९७ चे कलम १, २, ३ अन्वये दिनांक २१/०४/२०२० रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीस अटक केल्यानंतर न्यायालयाने त्यास जामीनावर मुक्त केले आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पंतप्रधान किसान सन्मान योजनेचा निधी शेतकऱ्यांना देण्याबाबत

**(२७) ३९८८ (०९-०९-२०२०) श्री.सदाशिव खोत, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लॉकडाऊनच्या आर्थिक अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांना केंद्र शासनाने पंतप्रधान किसान सन्मान योजनेचा निधी देत दिलासा देण्याचा प्रयत्न करीत असताना राज्य शासनाने शेतकऱ्यांना मिळणारा सदरचा रुपये दोन हजारांचा निधी शेतकऱ्यांच्या खात्यात जमा न करता सदरहू निधी थांबविल्याचे माहे एप्रिल, २०२० च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अमरावती जिल्ह्यातील वीस हजाराहून जास्त शेतकऱ्यांना पंतप्रधान किसान सन्मान योजनेचा निधी मिळाला नसून शेतकऱ्यांची ऑनलाईन पडताळणी केली असता राज्य शासनाने सदरहू निधी थांबविल्याचा संदेश पोर्टलवर दिसत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अशीच परिस्थिती राज्यातील अन्य जिल्ह्यातील शेतकऱ्यांची आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पंतप्रधान किसान सन्मान योजनेचा निधी शेतकऱ्यांना देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (०५-११-२०२०) :** (१) व (२) होय, अंशत: खरे आहे.

प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेचा लाभ लाभार्थ्यांना हस्तांतरित करण्यासाठी उपलब्ध झालेल्या डेटाची जिल्हास्तरावर अंतिम तपासणी केल्यावर काही त्रुटी आढळल्यास अशा पात्र लाभार्थ्यांचा तसेच अपात्र लाभार्थ्यांचा जिल्ह्याकडून लाभ थांबविण्याबाबतची शिफारस प्राप्त झाल्यानंतर पात्र लाभार्थ्यांचा लाभ त्रुटींची पुर्तता होईपर्यंत तात्पुरत्या स्वरुपात थांबविण्यात आलेला आहे.

पी.एम.किसान योजनेंतर्गत दिनांक २१ सप्टेंबर, २०२० अखेर अमरावती जिल्ह्यातील २,७६,०७५ लाभार्थ्यांना पहिला हप्ता, २,७२,५९४ लाभार्थ्यांना दुसरा हप्ता, २,५२,७०४ लाभार्थ्यांना तिसरा हप्ता, १,८९,५२९ लाभार्थ्यांना चौथा हप्ता, १,६१,१४४ लाभार्थ्यांना पाचवा हप्ता व ८२,२७८ लाभार्थ्यांना सहावा हप्ता वितरीत करण्यात आला आहे.

पी.एम.किसान योजनेंतर्गत लाभार्थ्यांची जिल्हास्तरावर अंतिम पडताळणी केल्यानंतर काही तांत्रिक अडचणींमुळे Payment Stop केलेल्या अमरावती जिल्ह्यातील दिनांक २१ सप्टेंबर, २०२० अखेर पी.एम. किसान पोर्टलवर एकूण १,१४,९८६ लाभार्थ्यांचा डेटा जिल्हास्तरावर पुनश्च: दुरुस्तीसाठी उपलब्ध झाला आहे. त्यापैकी १,०४,४०७ लाभार्थ्यांचा डेटा दुरुस्ती करण्यात आला असून लाभ वितरीत करण्यासाठी स्वीकारण्यात आलेला आहे. तथापि, ८७८ अपात्र/मयत लाभार्थ्यांचा डेटा अस्वीकृत करण्यात आला आहे. उर्वरीत ९,७०१ लाभार्थ्यांचा डेटा दुरुस्तीची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(३) राज्यातील दिनांक २१ सप्टेंबर २०२० अखेर पी.एम. किसान पोर्टलवर एकूण १०,६८,३८० लाभार्थ्यांचा डेटा जिल्हास्तरावर पुनश्च: दुरुस्तीसाठी उपलब्ध झाला आहे. त्यापैकी ९,१९,५४८ लाभार्थ्यांचा डेटा दुरुस्ती करण्यात

आला असून लाभ वितरीत करण्यासाठी स्वीकारण्यात आलेला आहे. तथापि, १९,९५७ अपात्र/मयत लाभार्थ्यांचा डेटा अस्वीकृत करण्यात आला आहे. उर्वरीत १,२८,८७५ लाभार्थ्यांचा डेटा दुरुस्तीची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(४) सदर डेटा त्वरीत दुरुस्ती करण्याबाबतच्या सूचना राज्यातील सर्व नोडल अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी यांना देण्यात आलेल्या आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## ठाणे व कल्याण-डोंबिवली शहरात कम्युनिटी किचन अंतर्गत रेशन वाटप व वैद्यकीय साहित्य खरेदीत गैरप्रकार झाल्याबाबत

**(२८) ३९८९ (१६-०७-२०२०) श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.रमेशदादा पाटील, श्री.सदाशिव खोत, श्री.महादेव जानकर, श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कोविड-१९ च्या आपत्तीमध्ये शहरातील गरिबांना अन्न पुरविण्यासाठी कम्युनिटी किचन स्थापन करुन शासनाने ठाणे व कल्याण-डोंबिवली महापालिकेमार्फत तांदूळ, डाळ, तेल इत्यादी रेशन साहित्यासह दररोज ८० हजार जेवणाची पाकीटे वितरीत करण्याची मोहिम राबविण्यास सुरुवात केली. मात्र पूर्वेतील आडिवली, ढोकली व इतर परिसरात दिनांक २ मे, २०२० रोजी कोरडा भात व खराब भाजीची पाकीटे वितरीत करण्यात आल्याची तक्रार श्री.प्रेम यादव यांनी आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांचेकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ठाणे व कल्याण शहरातील काही लोकप्रतिनिधींनी महानगरपालिका यंत्रणांवर दबाव टाकून रेशन साहित्य तसेच वैद्यकीय साहित्य ताब्यात घेवून रेशन साहित्यांच्या पाकिटांवर स्वत:च्या नावाचे स्टिकर्स लावून कम्युनिटी किचन ऐवजी परस्पर रेशन वाटप केल्याचे माहे मे, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असून उक्त ठिकाणी मास्क, पीपीई किट, सॅनिटायझर, क्वारंटाईन केंद्रातील साहित्य आदींसह विविध साहित्याची अवास्तव दराने खरेदी केली जात असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त गैरप्रकाराबाबत तात्काळ चौकशी करून संबंधितांविरुध्द कारवाई करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी (कोकण पदवीधर) आयुक्त, ठाणे मनपा यांना दिनांक ४ मे, २०२० रोजी निवेदनाव्दारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधित दोषींवर कोणत्या स्वरुपाची कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२६-१०-२०२०) :** (१) व (२) कल्याण-डोंबिवली महापालिकेने स्वयंसेवी संघटना व राज्य शासनाच्यावतीने कम्युनिटी किचनच्या माध्यमातून दिनांक ३१/०५/२०२० पर्यंत एकूण २७,३१,६३० एवढ्या शिजवलेल्या फुड पॅकेटचे वितरण केले आहे.

कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने विस्थापित कामगारांना तांदुळ, डाळ, तेल इत्यादी रेशन साहित्य पुरविले नाही.

तथापि, सुरुवातीच्या काळात काही दानशुर व्यक्ती, स्वयंसेवी सस्था यांनी महानगरपालिका हद्दीत रेशन किटचे वाटप केले आहे.

कल्याण-डोंबिवली महापालिकेकडे श्री.प्रेम यादव यांची तक्रार दिनांक ०२/०५/२०२० वा त्यासुमारास आली नसल्याचे कल्याण-डोंबिवली महापालिकेने कळविले आहे.

ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील ज्या सामाजिक संस्था गरजू, बेघर, स्थलांतरीत व्यक्तींना भोजन पुरवठा करणाऱ्या संस्थांना "कम्युनिटी किचन" म्हणुन घोषित केले आहे. सदर संस्थांनी १९,३१,४१८ इतके फुड पॅकेट शहरात वाटप केले आहेत.

ठाणे महानगरपालिकेच्या आरोग्य विभागास विविध बाबीच्या खरेदीसाठी पुरवठा करणाऱ्या पुरवठादाराचा दर योग्य असल्याची खात्री झाल्यानंतरच महापालिकेने उपलब्धतेनुसार आवश्यक परिमाणात खरेदी केली असल्याची बाब ठाणे महानगरपालिकेने कळविली आहे.

(३) ठाणे महानगरपालिकेने अशा प्रकारचे निवेदन प्राप्त झाले नसल्याचे कळविले आहे.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नाशिक जिल्ह्यात तसेच राज्यात अवकाळी पावसामुळे कांदा व द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांच्या नुकसान भरपाईबाबत

**(२९) ४०५८ (१७-०७-२०२०) श्री.गोपिचंद पडळकर, श्री.सदाशिव खोत, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यात अवकाळी पावसामुळे तसेच राज्यात मोठ्या प्रमाणात उत्पन्न होत असलेल्या कांदा व द्राक्ष उत्पादक शेतकऱ्याचे नुकसान झाले असल्याचे माहे मे, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोरोना महामारीच्या संकटामुळे जिल्ह्यात कृषी व्यवसायाला अंदाजे पाच हजार करोड रुपयाचे नुकसान झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, एका बाजूला कोरोनाचे संकट व दुसरीकडे अवकाळी पाऊस यासारख्या संकटामुळे शेतकरी अडचणीत सापडला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने चौकशी सदरहू शेतकऱ्यांना अडचणीतून बाहेर काढण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विजय वडेट्टीवार (०२-११-२०२०) :** (१) होय, खरे आहे.

(२) व (३) होय, अंशत: खरे आहे.

कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी करण्यात आलेल्या लॉकडाऊन कालावधीमध्ये नाशिक जिल्ह्यात कृषी विभागामार्फत शेतकरी ते थेट ग्राहक विक्री ही संकल्पना मोठ्या प्रमाणात राबवून शेतकऱ्यांमार्फत

१२००७ मे. टन मालाचा पुरवठा करून रूपये ५८.६० कोटी इतक्या रक्कमेची उलाढाल करण्यात आलेली असून, शेतकऱ्यांना आर्थिक संकटातून सोडवण्याचा यशस्वी प्रयत्न केलेला आहे.
(४) कृषी आयुक्त, पुणे यांच्याकडून रुपये १०१.६५ लक्ष एवढया अनुदानाच्या मागणीचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला असून तो शासनाच्या विचाराधीन आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कल्याण-डोंबिवली महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी ई-निविदेच्या नावाखाली नुकसान केल्याबाबत

**(३०) ४०६३ (१६-०७-२०२०) श्री.गोपिचंद पडळकर, श्री.सदाशिव खोत, श्री.निलय नाईक :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण-डोंबिवली महापालिकेच्या काही ठराविक अधिकाऱ्यांनी ई-निविदेच्या नावाखाली २० ते २५ ठेकेदारांचे सिंडिकेट रिंग करून गत दहा वर्षात कोट्यवधी रुपयांचे नुकसान केले असून ठेकेदारांनी अधिकाऱ्यांशी संगनमत करुन सदर गैरव्यवहार केला असल्याचे माहे जून, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कल्याण-डोंबिवलीचा विकास झपाट्याने होत असताना अनेक विकास कामांचे लेखाशीर्ष अचानक गहाळ करण्याचे काम अधिकारी वर्गाकडून केला जात असल्याचा आरोप सर्वपक्षीय नगरसेवकांनी महासभेत केला होता, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधित दोषी विरोधात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०६-११-२०२०) :** (१), (२) व (३) दिनांक १९/०१/२०१३ च्या शासन निर्णयानुसार रुपये १० लक्ष किंवा त्यापेक्षा अधिक मुल्याच्या निविदांसाठी दिनांक ०१/०२/२०१३ पासून ई-निविदा प्रणाली राबविण्याचे शासनाचे निर्देश आहेत.

दिनांक २६/११/२०१३ रोजीच्या शासन निर्णयानुसार रुपये ३ लाखापेक्षा अधिक खर्चाच्या कामांना कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने ई-निविदा प्रणाली लागू केली आहे.

महानगरपालिकेच्या कामांच्या निविदा सूचनेची प्रसिध्दी महाराष्ट्र शासनाच्या NIC संकेतस्थळावर प्रसिध्द करून स्थानिक, जिल्हास्तरीय व राज्यस्तरीय वर्तमानपत्रामध्ये जाहिरात देऊन कामांची प्रसिध्दी दिली जाते.

या प्रक्रियेमध्ये पारदर्शकता आहे. शासन निर्णयानुसार ई-निविदा प्रसिध्दी, निविदा लिफाफे उघडणे, निविदा तपासणी व स्वीकृती याबाबत वेळोवेळी कार्यवाही करण्यात येते.

शासन निर्णयानुसार विहित नियमांचे व अटींचे पालन करून निविदा मंजूर करण्यात येतात.

मंजूर अंदाजपत्रकातील लेखाशिर्षानुसारच कामे प्रस्तावित करण्यात येत असल्याचे, कल्याण-डोंबिवली महानगरपालिककेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्य लोकसेवा आयोगातील परीक्षांमध्ये अनाथांसाठी असलेली राखीव पदे रद्द करून ती अन्य प्रवर्गाला देण्यात आल्याबाबत

**(३१) ४०७० (१६-०७-२०२०) श्री.गोपिचंद पडळकर, श्री.सदाशिव खोत, श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रामनिवास सिंह, श्री.प्रशांत परिचारक, श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अनाथ मुले, तरुणांना शासकीय नोकरी आणि शिक्षणात एक टक्का आरक्षण असतानाही शासनाने नुकत्याच झालेल्या राज्य लोकसेवा आयोगातील परीक्षांमध्ये उक्त प्रवर्गाचे आरक्षण डावलले असल्याचे माहे जून, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य लोकसेवा आयोगाच्या निकालावरून अनाथांसाठी असलेली राखीव पदे रद्द करून ती अन्य प्रवर्गाला दिली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार अनाथांचे आरक्षण डावलून ते इतर प्रवर्गाला बहाल करणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उध्दव ठाकरे (१०-११-२०२०) :** (१) राज्य सेवा परीक्षा-२०१९ च्या मागणीपत्रानुसार अनाथ प्रवर्गासाठी समांतर आरक्षणांतर्गत आरक्षित २ पदे परीक्षेच्या जाहिरातीत नमूद करण्यात आली होती व समांतर आरक्षित पदांसाठी लोक सेवा आयोगाकडून अवलंबिल्या जाणाऱ्या पध्दतीनुसारच या पदांसाठीचीही प्रक्रिया पूर्ण करण्यात आली.
(२), (३) व (४) अनाथांसाठी राखीव असलेली पदे रद्द करण्यात आली नसून, शासन निर्णय, महिला व बालविकास विभाग क्र.अमुजा-२०११/प्र.क्र.२१२/का-३, दिनांक ०२/०४/२०१८ मधील नियम क्र.७ मधील तरतूदीनुसार संबंधित आरक्षणाचा अनुशेष पुढे न ओढता खुल्या प्रवर्गातून गुणवत्तेनुसार इतर उमेदवारांची नियुक्ती करण्यात आली आहे.

---

## वन विभागांतर्गत आयएफएस अधिकाऱ्यांची पदे रिक्त असल्याबाबत

**(३२) ४०७९ (१४-०९-२०२०) श्री.रामदास आंबटकर, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील वन विभागांतर्गत १५ आयएफएस अधिकाऱ्यांची पदे रिक्त असल्याचे दिनांक १५ जून, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर वन विभागातील रिक्त पदे शासन भरणार आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय राठोड (२२-१०-२०२०) :** (१), (२) व (३) राज्यात भारतीय वन सेवा संवर्गात दिनांक ३०/०६/२०२० अखेर २७ पदे रिक्त होती. तद्नंतर, दिनांक १०/०८/२०२०, २५/०९/२०२० व ०१/१०/२०२० रोजीच्या शासन आदेशान्वये बदली/पदोन्नतीने झालेल्या पदस्थापनेनंतर सध्या १४ पदे रिक्त आहेत. भारतीय वन सेवेच्या विविध संवर्गातील पदोन्नतीबाबत विभागीय पदोन्नती समितीची बैठक आयोजित करण्याची कार्यवाही सुरु करण्यात आली आहे. त्यानुसार वनसंरक्षक ते प्रधान मुख्य वनसंरक्षक या स्तरावरील काही पदे उन्नत/अवनत करुन पदोन्नतीची कार्यवाही करण्यात येईल. या संदर्भात संबंधित श्रेणीतील रिक्त पदे निश्चित करण्यास केंद्र शासनाची मान्यता आवश्यक आहे. त्यानुसार केंद्र शासनास दिनांक १३/१०/२०२० रोजी प्रस्ताव सादर केला आहे. या कार्यवाहीतून बहुतांश अधिकारी पदोन्नतीकरीता दिनांक ०१/०१/२०२१ नंतर उपलब्ध होतील.

तसेच महाराष्ट्र वन सेवेतून भारतीय वन सेवेत पदोन्नती देण्यासंदर्भात सन २०१९ च्या निवडसूची संदर्भातील प्रस्ताव केंद्रीय लोकसेवा आयोगास दिनांक ३०/०९/२०२० रोजी सादर केला आहे. सदर निवडसूचीची कार्यवाही अंतिम झाल्यास ११ अधिकारी उपलब्ध होतील. असे असले तरी वेळोवेळी होणाऱ्या पदोन्नती/सेवानिवृत्तीमुळे सतत पदे रिक्त राहत असतात. सदर प्रक्रियेमध्ये कोणताही विलंब झालेला नाही.

---

## सैनिक स्कूलमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांना शुल्काचा आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत असल्याबाबत

**(३३) ४१३६ (१५-०७-२०२०) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रामनिवास सिंह, श्री.प्रशांत परिचारक, श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सैनिकी शिक्षण देणाऱ्या देशातील पहिल्या सातारा सैनिक स्कूलमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांना शुल्काचा आर्थिक भुर्दंड अनेक वर्षापासून सहन करावा लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विद्यार्थ्यांकडून आकारल्या जाणाऱ्या शैक्षणिक शुल्कातूनच शिक्षकांचे वेतन दिले जात असून त्यासाठी शासनाकडून इतर शाळांसारखे अनुदान दिले जात नसल्यामुळे शैक्षणिक शुल्क कमी करणे शाळा प्रशासनाला अशक्य असल्याचे सातारा सैनिक स्कूल व्यवस्थापनाकडून सांगण्यात आल्याची माहिती माहे जून, २०२० च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उत्पन्न मर्यादा तसेच शिष्यवृत्तीचे दर कमी असल्यामुळे पालकांना वाढीव शुल्काच्या भुर्दंडास सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सैनिकी शाळेत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्तीचे दर वाढविण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (२८-१०-२०२०) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) होय.

(३) अंशत: खरे आहे.

(४) व (५) सदर बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

---

## मुंबई महानगरपालिकेकडून निर्दयीपणे करण्यात येणाऱ्या वृक्ष छाटणीबाबत

**(३४) ४१३८ (१७-०८-२०२०) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रामनिवास सिंह, श्री.प्रशांत परिचारक, श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दादर, मुंबई येथील जी उत्तर विभागातील फांद्या छाटणी बद्दल मुंबई महानगरपालिका आयुक्त यांच्याकडे नागरिकांकडून दाखल झालेल्या तक्रारीनुसार उक्त ठिकाणी फांद्या छाटणी होत नसून झाडांची कत्तल करण्यात येत असल्याचे माहे जून, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबई महानगरपालिकेकडून वृक्ष छाटणी ही इलेक्ट्रिक करवतीच्या सहाय्याने होत असून वृक्ष छाटणीच्या वेळी तांत्रिक ज्ञान नसलेल्या कर्मचाऱ्यांवर छाटणीची संपूर्ण जबाबदारी सोपविण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच अशा प्रकारची वृक्ष छाटणी रोखण्यासाठी शासन कोणती भूमिका घेणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२९-१०-२०२०) :** (१) हे खरे नाही.

झाड/फांद्या पडून होणारी अप्रिय घटना/दुर्घटना तसेच जिवित तथा वित्तहानी टाळण्याकरीता झाडांच्या फांद्याची छाटणी महानगरपालिकाव्दारे नियुक्त केलेल्या ठेकेदारामार्फत करण्यात येते. सदर छाटणी करताना म.न.पा.च्या उद्यान विभागाच्या तांत्रिक दृष्ट्या सक्षम अधिकाऱ्यांच्या पर्यवेक्षण/मार्गदर्शन व सूचनेनुसार करण्यात येते. फांद्यांची छाटणी करताना कोठेही झाडांची कत्तल केलेली नाही. केवळ असंतुलित, रोगग्रस्त, झुकलेल्या फांद्या तसेच मृत व धोकादायक वृक्ष यांचीच छाटणी करण्यात येते. जी/उत्तर विभागात देखील झाड/फांद्या पडून कोणतीही दुर्घटना घडू नये या दृष्टीकोनातुन म.न.पा.च्या उद्यान विभागाच्या अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली व मार्गदर्शनानुसार आवश्यक तेवढीच वृक्ष छाटणी करण्यात आलेली आहे.

(२) हे खरे नाही.

वृक्ष छाटणी पूर्वीच्या जुन्या पध्दतीने केल्यास त्यास लागणार वेळ अधिक असतो. वृक्ष छाटणीकरीता इलेक्ट्रीक करवत वा तत्सम अवजारांचा वापर केल्यास वृक्ष छाटणीचे काम जलदगतीने करणे शक्य होते. तसेच,

त्यामुळे पावसाळ्यात उद्भवणाऱ्या आपत्कालीन परिस्थितीचे तातडीने निराकरण करणे देखील शक्य होते.

धोकादायक झाड/फांद्याची छाटणी/कापणी महानगरपालिकाव्दारे नियुक्त केलेल्या ठेकेदारामार्फत करण्यात येते. सदर छाटणी/कापणी ही मनपाच्या उद्यान विभागाच्या तांत्रिक दृष्ट्या सक्षम अधिकाऱ्यांच्या पर्यवेक्षण / मार्गदर्शन व सूचनेनुसारच करण्यात येते.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## माझगाव (मुंबई) येथील हँकॉक पुलाची पुनर्बांधणी करण्याबाबत

**(३५) ४१४० (१७-०७-२०२०) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रामनिवास सिंह, श्री.प्रशांत परिचारक, श्री.महादेव जानकर : तारांकित प्रश्न क्रमांक १५९८ ला दिनांक ४ मार्च, २०२० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माझगाव (मुंबई) येथून डोंगरी, जे.जे. रुग्णालय, नूरबाग परिसरातून माझगाव, वाडीबंदर भागात जाणाऱ्या नागरिकांसाठी महत्वाचा असलेला हँकॉक पूल धोकादायक असल्याने तो तातडीने बांधण्याची घोषणा करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पुलाच्या बांधकामास सुरुवात केली असता रेल्वे हद्दीतील गडर्स टाकण्यासाठी कंत्राटदाराच्या मशीन पोहोचल्या असता ऐनवेळी महानगरपालिका व मध्य रेल्वेचा करार झाला नसल्याचे समोर आल्यामुळे पुन्हा या पुलाचे काम अपूर्णावस्थेत राहिल्याची बाब माहे जून, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार मुंबईतील नागरिकांसाठी महत्वाचा असलेला हँकॉक पूलाच्या उभारणीसाठी कोणती कार्यवाही किंवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२७-१०-२०२०) :** (१), (२) व (३) हँकॉक पूल रेल्वे प्रशासनामार्फत माहे जानेवारी, २०१६ मध्ये तोडण्यात आला होता. रेल्वे प्रशासन व बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्या संयुक्तीक बैठकीमध्ये संपूर्ण पूल महानगरपालिकेमार्फत बांधण्याचे ठरविण्यात आले. त्यानुसार महानगरपालिकेमार्फत निविदा काढून कंत्राटदारास दिनांक १२/०२/२०१८ रोजी कार्यादेश देण्यात आला.

माहे एप्रिल, २०१९ मध्ये महानगरपालिकेमार्फत रेल्वे प्रशासनाच्या जागेवरील झोपड्यांचे निष्कास करण्यात आले असून रेल्वे भागाच्या दोन्ही बाजूच्या पायाभरणीच संपूर्ण काम पूर्ण झाले आहे. रेल्वे सुरक्षा आयुक्तांच्या ना-हरकत प्रमाणपत्रानुसार पहिल्या स्पॅनच्या गर्डर लाँचींगचे काम पूर्ण झाले आहे. तसेच दुसऱ्या स्पॅनच्या गर्डरचे फेब्रीकेशन प्रगतीपथावर आहे.

हँकॉक पूलाचे संपूर्ण काम दिनांक ३१ मार्च, २०२१ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे असे महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## खेड (जि.रत्नागिरी) मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीच्या बांधकामाकरीता निधी देण्याबाबत

**(३६) ४१४९ (१४-०९-२०२०) श्री.रामदास कदम :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खेड (जि.रत्नागिरी) तालुक्यातील मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीच्या दुसऱ्या व तिसऱ्या मजल्याच्या बांधकामाच्या अंदाजपत्रकास मान्यता देऊन निधी उपलब्ध करणेबाबत दिनांक २४ फेब्रुवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास शासनाकडे पत्रव्यवहार करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निधी उपलब्ध करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अशोकराव चव्हाण (१०-११-२०२०) :** (१) व (२) हे खरे नाही.

खेड (जि.रत्नागिरी) येथील मध्यवर्ती प्रशासकीय इमारत (टप्पा-१) बांधकामाच्या मूळ मंजूर प्रशासकीय मान्यता रक्कमेत इमारतीच्या तळ मजला व पहिल्या मजल्याचे बांधकाम करणे शक्य झाले आहे. उपभोक्ता विभागाकडून दुसऱ्या व तिसऱ्या मजल्याबाबत कोणतीही मागणी प्राप्त नाही. असा प्रस्ताव प्राप्त झाल्यास आवश्यकतेनुसार प्रशासकीय मान्यता व निधी उपलब्धतेकरीता पुढील कार्यवाही करण्यात येईल

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील शाळांनी टाळेबंदीपूर्वी केलेली शुल्क वाढ रद्द करण्याबाबत

**(३७) ४१५१ (१७-०७-२०२०) श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या शालेय शिक्षण विभागाने दिनांक ८ मे, २०२० रोजी जाहीर केलेल्या शासन निर्णयानुसार कोरोना आणि टाळेबंदीच्या पार्श्वभूमीवर यंदाच्या शैक्षणिक वर्षात राज्यातील शाळांना शुल्क वाढ करण्यास मनाई करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्रीय आणि आंतरराष्ट्रीय शिक्षण मंडळाच्या काही शाळा माहे मार्च-एप्रिल, २०२० मध्ये सुरू झाल्याने या शाळांनी नियमितपणे शुल्क वाढ करून पालकांकडून टाळेबंदीपूर्वीच रक्कम वसूल केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील सर्वसामान्य पालकांना दिलासा देण्यासाठी शाळांनी टाळेबंदीपूर्वी केलेली शुल्क वाढ रद्द करून अतिरिक्त रक्कम पालकांना परत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (२८-१०-२०२०) :** (१) हे खरे आहे.

(२) अंशतः खरे आहे.

(३) व (४) शासनाच्या दिनांक ८ मे, २०२० रोजीच्या शासन निर्णयास मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिनांक २६ जून, २०२० रोजीच्या आदेशान्वये अंतरिम स्थगिती दिली आहे. सदर आदेशाविरुध्द शासनाच्यावतीने मा.सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका दाखल करण्यात आली असून सद्य:स्थितीत प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

---

## राज्यातील पालक संघटनेने विद्यार्थ्यांच्या हिताच्यादृष्टीने विविध मागण्या केल्याबाबत

**(३८) ४१५६ (१७-०७-२०२०) श्री.विलास पोतनीस : तारांकित प्रश्न क्रमांक २४४९ ला दिनांक २७ मार्च, २०२० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) अधिनियमात असलेल्या अनेक जाचक अटी दूर करण्यासह शिक्षणाचा दर्जा सुधारणे, शालेय बसमधील विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या मुद्द्यांवर सुधारणा करण्यात यावी, शाळेतून गणवेश व पुस्तके खरेदी करण्याचे बंधन, नियमांचे पालन न करणाऱ्या शाळा शासनाने ताब्यात घेणे, स्कूलबस, शाळा, वर्गखोल्यांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसवणे, शुल्कावरून विद्यार्थ्याला लक्ष्य न करणे अशा विविध मागण्या इंडिया व्हाईड पॅरेंटस असोशिएशन या पालक संघटनेने माहे जून, २०२० च्या पहिल्या आठवड्यात मा.शालेय शिक्षण मंत्री महोदयांकडे केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पालक संघटनेने केलेल्या उपरोक्त विविध मागण्या मान्य करण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (२८-१०-२०२०)** : (१) हे खरे आहे.

(२) सदर बाब शासनस्तरावर तपासण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सालवड येथे महाराष्ट्र औद्योगिक महामंडळाच्या जागेवर अवैधरित्या गौण खनिजाचा साठा करण्यात येत असल्याबाबत

**(३९) ४१५८ (१५-०७-२०२०) श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तारापूर औद्योगिक क्षेत्रात सालवड येथील गौण खनिज माफिया अवैध पध्दतीने गौण खनिजाचा साठा करण्यासाठी महाराष्ट्र औद्योगिक महामंडळाच्या जागेचा वापर करीत असल्याची बाब दिनांक १९ जून, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने महाराष्ट्र औद्योगिक महामंडळाच्या जागेवर अनधिकृतपणे गौण खनिजाचा साठा करणाऱ्या संबंधितांवर आणि या सर्व प्रकारास सहकार्य करणाऱ्या महामंडळाच्या अधिकाऱ्यांवर शासनाकडून कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देसाई (२३-१०-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सालवड येथील औद्योगिक क्षेत्राच्या open Space २४ येथील भुखंडावर मुरूम/डेब्रीज टाकणाऱ्या काही वाहनांची, त्यांच्या नंबर सहीत व वाहनांच्या कंपनीच्या नावासहीत सविस्तर माहिती, बोईसर पोलीस ठाणे यांना कायदेशीर कारवाई करण्याबाबत कळविण्यात आली असून सदरील पत्राची प्रत तहसिलदार, पालघर यांना पुढील कार्यवाहीसाठी पाठविलेली आहे.

सदरील भुखंडावर पुन:श्च मुरूम/डेब्रीज यांची अवैधरित्या साठवण होऊ नये यासाठी मे.युपीएल कंपनी यांना भूखंड क्र.ई-२२ च्या रस्त्याच्या बाजूची जागा बागबगीचा व सुशोभिकरणासाठी दिली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या तिन्ही जिल्ह्यांना जोडणारा ग्रीन फील्ड महामार्ग बांधण्याच्या प्रस्तावाबाबत

**(४०) ४१६७ (१४-०९-२०२०) श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई ते नागपूरला जोडणाऱ्या समृध्दी महामार्गाच्या धर्तीवर कोकणाच्या सर्वांगीण विकासासाठी रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या तिन्ही जिल्ह्यांना जोडणारा ग्रीन फील्ड महामार्ग बांधण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त महामार्गासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळास तांत्रिक व वित्तीय अहवाल तयार करण्याचे निर्देश माहे मार्च, २०२० मध्ये वा त्यादरम्यान शासनाने दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर महामार्गाची एकूण लांबी किती किलोमीटर असणार आहे तसेच या महामार्गाच्या बांधकामासाठी किती कोटी रुपयांची आवश्यकता असून त्यास किती कालावधी लागणे अपेक्षित आहे ?

**श्री.एकनाथ शिंदे (२३-१०-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) महामार्गाची एकूण लांबी-अंदाजे ५०० कि.मी. आहे. या प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल बनविण्यासाठी तांत्रिक सल्लागार नेमण्याची निविदा प्रक्रिया सुरु आहे. सविस्तर प्रकल्प अहवाल बनविण्यासाठी किमान १ वर्ष कालावधी अपेक्षित आहे. बांधकामाचा अंदाजित ढोबळमानाने खर्च रुपये ७१,३०० कोटी (अक्षरी रुपये एकाहत्तर हजार तीनशे कोटी फक्त) आहे.

---

## महाराष्ट्र लोकसेवा आयोग परिक्षेच्या नियोजनाबाबत

**(४१) ४२१८ (१६-०७-२०२०) श्री.अंबादास दानवे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची पूर्व परीक्षा दिनांक ५ एप्रिल, २०२० रोजी होणार होती, परंतु कोविड-१९ व्हायरच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे सदर परीक्षा रद्द करुन आता माहे सप्टेंबर, २०२० मध्ये कोरोनाचा प्रादुर्भाव कमी होण्याच्या अटीवर होणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोरोनाचा प्रादुर्भाव माहे सप्टेंबर, २०२० पर्यंत कमी न झाल्यास परीक्षा पुन्हा लांबणीवर पडण्याची शक्यता असल्याने मुख्य परीक्षा आणि त्यानंतर मुलाखती कधी होणार याचे नियोजन करुन निश्चित धोरण आखण्यात आले आहे काय, तसेच सन २०२० च्या परिक्षेबरोबर सन २०२१ च्या परीक्षा घेणार आहे काय, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उध्दव ठाकरे (१०-११-२०२०) :** (१) नोवेल कोरोना (Covid-१९) विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्याकरीता सुरु असलेल्या प्रतिबंधात्मक उपाययोजना व लॉकडाऊनचा कालावधी विचारात घेवून आयोगामार्फत राज्य सेवा पूर्व परीक्षा दिनांक ५ एप्रिल,२०२० ऐवजी दिनांक १३ सप्टेंबर, २०२० रोजी घेण्याचे नियोजन करण्यात आले आहे. केंद्र आणि राज्य शासन तसेच स्थानिक प्राधिकरणाकडून वेळोवेळी जारी केलेल्या मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करुन परिक्षांचे आयोजन नियोजित करण्यात आले आहे.

(२) व (३) कोविड-१९ च्या अनुषंगाने वेळोवेळी देण्यात येणाऱ्या मार्गदर्शक सूचनांनुसार राज्य सेवा पूर्व परीक्षा झाल्यानंतरच मुख्य परीक्षा व मुलाखतीबाबत नियोजन करण्यात येईल. सन २०२० च्या परिक्षेचे आयोजन पूर्ण झाल्यानंतर सन २०२१ च्या परिक्षांचे आयोजन करण्याबाबत निर्णय घेण्यात येईल.

---

## औरंगाबाद महापालिकेतील तसेच खाजगी अनुदानित, विनाअनुदानित शाळेतील शिक्षक कोरोना वॉरीयर्स म्हणुन रुजु न झाल्याबाबत

**(४२) ४२२१ (१४-०९-२०२०) श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद महानगरपालिकेच्या प्रशासकांनी महानगरपालिकाक्षेत्रातील पन्नास किंवा त्यापेक्षा जास्त वयोगटाच्या जेष्ठ नागरिकांचे सर्वेक्षण करुन त्यांच्या आरोग्याबद्दलची नोंद घेण्यासाठी शहरातील खाजगी अनुदानित, विनाअनुदानित तसेच महापालिकेच्या शिक्षकांना कोरोना वॉरीयर्स म्हणून नियुक्त केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कामाकरीता नियुक्त केलेल्या १७९३ शिक्षकांपैकी ७१९ शिक्षक माहे जून, २०२० मध्ये वा त्यादरम्यान नियुक्त झाले. परंतु, उर्वरीत शिक्षक अद्याप रुजु झालेच नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२२-१०-२०२०) :** (१), (२) व (३) औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रात शुगर, ब्लडप्रेशर, हृदयविकास, हृदयाविषयी आजार, किडणीचे विकार, दमा इ. आजार असलेल्या लोकांना कोविड-१९ चा संसर्ग झाल्यास तो धोकादायक असल्याने त्यांना वेळीच उपचार करण्याकरीता “MHMH” या ॲपच्या माध्यमातून महानगरपालिकेमार्फत सर्वेक्षण मोहिम हाती घेण्यात आली होती.

सदर सर्वेक्षणाकरीता शहरातील विविध शिक्षण संस्थांकडून एकूण १७९३ शिक्षकांची नियुक्ती करण्यात आली होती. तथापि, त्यापैकी ७१९ शिक्षक रुजू झाले, ही वस्तुस्थिती आहे.

उर्वरित शिक्षक हे ५५ वर्षापेक्षा जास्त वय असलेले, वैद्यकीय रजेवर असलेले, बदली झालेले तसेच सेवानिवृत्त झालेले शिक्षक असल्याचे आढळून आले.

सदर शिक्षकांनी ते सर्वेक्षणावरील काम करण्यास समर्थ नसल्याचे कारण दिल्याने रुजू झालेल्या शिक्षकांमधून प्रस्तुत सर्वेक्षणाचे काम पूर्ण करुन घेण्यात येत असल्याचे औरंगाबाद महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील होमगार्डना ऑनलाईन संगणक प्रणाली शिवाय कर्तव्यावर घेण्याबाबत

**(४३) ४२५५ (१६-०७-२०२०) डॉ.रणजित पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ४९२ ला दिनांक ५ मार्च, २०२० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील होमगार्डना ऑनलाईन संगणक प्रणालीशिवाय कर्तव्यावर घेऊ नये, कोणत्याही होमगार्डला कर्तव्यावर कायम काम मिळेल याचे आश्वासन देऊ नये, सलग कर्तव्य मिळाले तरी त्यांना अन्य कोणत्याही लाभासाठी दावा करता येणार नाही, असे लेखी आदेश दिनांक १३ ऑगस्ट, २०१९ रोजी वा त्यासुमारास होमगार्ड महाराष्ट्र राज्य कार्यालयाने सर्व जिल्हा समादेशक यांना पाठविले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर आदेशात बृहन्मुंबई, ठाणे व पालघर या जिल्ह्यांना वगळण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सद्य:स्थितीत वाढत्या महागाईनुसार काम करुनही कायमस्वरुपी नियुक्ती मिळत नसल्याने होमगार्डचे भवितव्य धोक्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने राज्यातील होमगार्डच्या मागण्याबाबत पुनर्विचार करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख (२३-१०-२०२०) :** (१) हे खरे आहे.

(२) सदर आदेशात बृहन्मुंबई, ठाणे व पालघर यांचा समावेश करण्यात आला नव्हता. परंतु बृहन्मुंबई, ठाणे व पालघर जिल्ह्यांसाठी स्वंतत्र आदेश दिनांक २०/०८/२०१९ रोजी निर्गमित करण्यात आलेले आहेत. त्यामुळे सर्व जिल्हा कार्यालयांना याबाबतचे आदेश निर्गमित केले आहेत. कोणत्याही जिल्ह्यास वगळण्यात आलेले नाही.

(३) होमगार्ड अधिनियम १९४७ मध्ये होमगार्डना कार्यात कायम करणाची तरतूद नाही.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कल्याण (जि.ठाणे) येथील कुष्ठरुग्ण वसाहतीमधील दवाखान्याच्या इमारतीची दुरवस्था झाल्याबाबत

**(४४) ४५६० (१७-०८-२०२०) श्री.विजय उर्फ भाई गिरकर :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण येथील कचोरे परिसरातील हनुमाननगर कुष्ठरुग्ण वसाहतीमधील दवाखान्याच्या इमारतीची जीर्ण अवस्थेमुळे पडझड झाली असून परिणामी जागे अभावी माहे फेब्रुवारी, २०१९ पासून शेजारच्या शाळे लगतच्या सभागृहात कुष्ठ रोगांवर उपचार केले जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एक वर्षाहून अधिक काळ लोटूनही वापराविना आणि जीर्ण झालेली वास्तू आजही जैसे थे धोकादायक अवस्थेत उभी असल्याने एखादा भाग कोसळून अपघात होण्याची भिती निर्माण झाल्याची बाब दिनांक १७ जून, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेचे दुर्लक्ष होत असल्यामुळे सदर दवाखान्याच्या उभारणीसाठी कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०६-११-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) सदर इमारतीचे बांधकाम ३० वर्षापुर्वीचे असून इमारत जीर्ण झाली असल्याने या तीचा वापर थांबविण्यात आलेला आहे. दिनांक २३/०६/२०२० रोजी या इमारतीचा धोकादायक भाग तोडण्यात आलेला आहे.

सदर इमारतीचे दुरूस्तीचे काम दिनांक २३/१०/२०२० रोजी सुरू करण्यात आले असून पुढील २ महिन्यात पूर्ण करण्याचे महानगरपालिकेचे नियोजन आहे.

या परिसरात नवीन इमारत बांधणे प्रस्तावित आहे. नवीन इमारतीचे बांधकाम करण्यासाठीचे कार्यादेश देण्यात आले असल्याचे, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## परळ (मुंबई) येथील रघुवंशी मिलला लागलेल्या आगीबाबत

**(४५) ४५९५ (१६-०७-२०२०) श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परळ (मुंबई) येथील रघुवंशी मिलला आग लागल्याची बाब माहे जून, २०२० च्या चौथ्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आग कशामुळे लागली आणि आगीत झालेल्या नुकसानीच्या अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने अशा आगी पुन्हा लागू नयेत याकरीता कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०२-११-२०२०) :** (१) परळ येथील रघुवंशी मिल कंपाऊंडमधील तळमजला + २ मजले असलेल्या पी-२ या इमारतीच्या दुसऱ्या मजल्यास दिनांक २५ जून, २०२० रोजी आग लागली होती.

(२) सदर प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत चौकशी करण्यात आली असून, सदर आगीचे संभाव्य कारण "सदोष विद्युत प्रणाली" असे आढळून आले आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

तसेच, सदर आगीमुळे १२ आस्थापनांच्या मालमत्तेचे अंदाजे रुपये १३.७५ कोटी इतके नुकसान झाले आहे. तथापि, सदर नुकसानीचा अहवाल शासनास पाठविण्यात आला नसल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

मुंबईतील प्रत्येक आगीच्या दुर्घटनांच्या कारणांची बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागामार्फत चौकशी करण्यात येऊन, आगीच्या दुर्घटना घडू नये याकरीता उपाययोजना सुचविल्या जातात. तसेच, महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ अन्वये कारवाई करण्यात येते.

भविष्यात आगीच्या दुर्घटना घडू नयेत याकरीता बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात :-

- प्रत्येक विभाग कार्यालयामध्ये "अग्निसुरक्षा पालन कक्ष" स्थापन करण्यात आला आहे.
- सदर कक्षामार्फत विभागनिहाय आस्थापनांची यादृच्छिक (रॅन्डमली) तपासणी करण्यात येते.
- त्यानुसार माहे जानेवारी, २०१९ ते माहे जानेवारी, २०२० या कालावधीमध्ये १२,७४३ आस्थापनांची तपासणी करण्यात आली असून, सदर कारवाई दरम्यान ११,७६२ एल.पी. गॅस सिलेंडर जप्त करण्यात आले आहेत.
- मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ३९४ च्या अंतर्गत येणाऱ्या बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील आस्थापनांना अग्निसुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक असणाऱ्या मूलभूत उपाययोजना (कोडीफाईड रिक्वायरमेंट्स) महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आल्या आहेत.

- मुंबई अग्निशमन दलामार्फत जनजागृतीच्या माध्यमातून अग्नि स्वयंसेवक तयार करण्यात येतात. त्यानुसार माहे जानेवारी, २०२० पर्यंत एकूण ६४२६ स्वयंसेवकांना आग प्रतिबंधक उपाययोजना, मूलभूत अग्निशमन व अग्निसुरक्षेचे उपाय यांची माहिती व प्रशिक्षण विनामुल्य देण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई उपनगरातील सांताक्रुझ (पश्चिम) येथील स्वामी मुक्तानंद पार्कचे सुशोभिकरण व दुरूस्तीचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(४६) ४६६१ (१७-०७-२०२०) श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगरातील सांताक्रुझ (पश्चिम) येथील सरस्वती रोडजवळ महापालिकेच्या स्वामी मुक्तानंद पार्कचे सुशोभिकरण व दुरूस्तीचे काम माहे जून, २०१८ पासून सुरू करण्यात आले असून ५० टक्के कामही पूर्ण झालेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त काम पूर्ण करण्याची १५ महिन्यांची मुदत संपुष्टात आली असूनही सदर पार्कच्या सुशोभिकरण व दुरूस्तीचे काम प्रलंबित असल्यामुळे परिसरातील नागरीकांची नाहक गैरसोय होत असल्याने उद्यानाचे काम वेगाने पूर्ण करण्याची मागणी रहिवाश्यांकडून करण्यात येते आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०२-११-२०२०) :** (१) सांताक्रुझ (प) येथील सरस्वती रोडजवळील स्वामी मुक्तानंद पार्कच्या सुशोभिकरण व दुरुस्तीच्या कामाचा कार्यादेश बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत माहे मार्च, २०१९ मध्ये देण्यात आला होता.

परंतु सन २०१९ लोकसभा निवडणुकीच्या आचार संहितेमुळे सदर काम माहे जून, २०१९ मध्ये सुरु करण्यात आले आहे.

सद्य:स्थितीत ८० टक्के काम पूर्ण झाले असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(२) सदर कामाच्या कंत्राटाचा कालावधी १५ महिने असून तो माहे सप्टेंबर, २०२० पर्यंत आहे.

परंतु, माहे मार्च, २०२० पासून कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे कामाचा वेग मंदावला असून कंत्राटदारास माहे सप्टेंबर, २०२० पर्यंत सदर काम पूर्ण करण्यासाठी निर्देशित करण्यात आले होते. तथापि, सदर कालावधीतही कोरोना महामारीच्या प्रभावामुळे कामासाठी पुरेसे मनुष्यबळ व बांधकाम साहित्य उपलब्ध होऊ शकले नाही.

त्यामुळे सदर काम माहे डिसेंबर, २०२० पर्यंत पूर्ण करण्यासाठी महानगरपालिकेमार्फत कंत्राटदारास नव्याने निर्देशित करण्यात आले आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## गोरेगाव, सिध्दार्थ नगर येथील पत्रा चाळ पुनर्विकास प्रकल्प अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(४७) ४७५९ (१९-०८-२०२०) श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.सदाशिव खोत, श्री.महादेव जानकर, श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोरेगाव, सिध्दार्थ नगर येथील म्हाडाच्या मालकीच्या भूखंडावर असलेल्या पत्रा चाळ पुनर्विकास प्रकल्प गत काही वर्षांपासून प्रलंबित असल्याप्रकरणी तसेच पत्रा चाळीतील रहिवाशांचे थकीत भाडे, पुनर्वसन प्रक्रिया म्हाडाच्या सोडतीमधील ३०६ विजेत्यांना सदनिका वितरीत करण्याच्या संदर्भात उपाययोजना सुचविण्यासाठी माजी मुख्य सचिव जॉनी जोसेफ यांची शासनाने माहे फेब्रुवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान समिती नेमून सदर समितीस १५ दिवसात आपला अहवाल सादर करण्याबाबत आदेशित करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहे मार्च, २०२० मध्ये राज्यात टाळेबंदी लागू होईपर्यंत उक्त अहवाल शासनास प्राप्त झाला नसल्यामुळे दिनांक २४ जुलै, २०२० रोजी अधिसूचना काढण्यात आली असली तरी दिनांक ०१ जुलै, २०२० पासून ३० दिवस म्हणजे ३० जुलैपर्यंत समितीने शासनास अहवाल सादर करणे अपेक्षित असतानाही आजमितीस सदर अहवाल शासनास प्राप्त झालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर समितीचा अहवाल शासनास प्राप्त होण्यास विलंब होण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने पत्रा चाळीच्या पुनर्विकासाचे काम विनाविलंब हाती घेऊन पूर्ण करण्याचे दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जितेंद्र आव्हाड (२६-१०-२०२०) :** (१) व (२) हे खरे आहे.

(३), (४) व (५) सदर प्रकरणी मा.सर्वोच्च न्यायालयाने आदेशित केल्यानुसार NCLT कडे दाखल असलेल्या Resolution Plan वरील निर्णय दिनांक ०७/०९/२०२० रोजी पारीत झाले आहेत. त्यानुसार NCLT ने Resolution Professional यांची Liquidator म्हणून नियुक्ती केलेली आहे. या प्रकरणी मा.उच्च न्यायालयात काही याचिका दाखल झालेल्या आहेत. शिवाय कोविड-१९ साथीमुळे राज्यात करण्यात आलेल्या टाळेबंदीमुळे समितीस आवश्यक असलेली माहिती संकलीत करण्यास व तीचे विश्लेषण करण्यास विलंब होत असल्याचे समितीने शासनास कळविले आहे.

---

## समाजकार्य महाविद्यालयातील ग्रंथपालांना देय लाभ मंजूर करण्याबाबत

**(४८) ३७५६३ (१४-०८-२०१८) श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा सन १९९४ व सन २०१६ युजीसी व केंद्रीय मानव संसाधन विकास मंत्रालय यांच्या शासन निर्णय व अध्यादेशानुसार समाजकार्य महाविद्यालयातील ग्रंथपाल हे शिक्षक संवर्गात येत असल्याने त्यांना महाविद्यालयातील शिक्षकांना लागू असलेले लाभ देण्यात येतात, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सामाजिक न्याय विभागांतर्गत समाजकार्य महाविद्यालयातील ग्रंथपालांना महाविद्यालयीन शिक्षकांप्रमाणे एम.फिल/पीएच.डी.चे इंन्क्रीमेंट, स्थान निश्‍चिती व सेवार्थ प्रणालीमधील सेवानिवृत्तीचे वय ५८ ऐवजी ६० असणे इत्यादी लाभ दिले जात नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन समाजकार्य महाविद्यालयीन ग्रंथपालांना महाविद्यालयातील शिक्षकांप्रमाणे लाभ देण्याबाबत शासन निर्णय केव्हापर्यंत घेण्यात येणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे (०५-११-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.

दिनांक १४ नोव्हेंबर, १९९५ चा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.
(२) हे खरे नाही, सामाजिक न्याय विभागामार्फत समाजकार्य महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वय ६० वर्ष इतके राहिल असा दिनांक २३/०८/२०१८ चा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.
(३) समाजकार्य महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सेवा व त्या अनुषंगीक बाबींचे निराकरण त्वरीत होण्याच्या दृष्टीने आयुक्त, समाजकल्याण पुणे यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २२ जानेवारी, २०२० च्या शासन निर्णयान्वये समिती गठीत करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

___

## नाशिक विभागातील अपर आयुक्तांनी आदिवासी मुला-मुलींसाठी निवासी स्वतंत्र आश्रमशाळेच्या प्रस्तावाबाबत

**(४९) ४८३७६ (०६-०७-२०१९) श्री.सुजितसिंह ठाकूर :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक विभागातील अपर आयुक्तांनी आदिवासी मुला-मुलींसाठी निवासी स्वतंत्र आश्रमशाळा ठेवण्याचा प्रस्ताव शासनाकडे माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान पाठविला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावाचे स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, सदर प्रस्तावास शासनाने मान्यता दिली आहे काय व त्याची अंमलबजावणी शासन केंव्हापासून करणार आहे,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी (२८-१०-२०२०) :** (१) हे खरे नाही.

(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील ग्रामीण व दुर्गम भागात उत्तम आरोग्य व सोयी सुविधा पुरविण्याबाबत

**(५०) ४८६६३ (०५-०७-२०१९) श्री.नरेंद्र दराडे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्रामीण व दुर्गम भागात उत्तम आरोग्य व सोयी सुविधा पुरविण्यासाठी कृत्रिम बुध्दीमतीचा (आर्टिफिशीयल इंटेलीजन्स) वापर करुन सामान्यांना गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा देण्यासाठी नवीन तंत्रज्ञानाचा वापर करुन माता व बालमृत्यूचे प्रमाण कमी करण्यासाठीचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या उपक्रमासाठी शासन ब्रिटनचे सहकार्य घेणार आहे, या प्रकल्पाचे स्वरुप काय आहे व अंमलबजावणीसाठी किती कालावधी अपेक्षित आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (२७-१०-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.

आर्टिफिशीयल इंटेलीजन्स अंतर्गत ६ प्रकल्पांची अंमलबजावणी प्रायोगिक तत्वावर चालू आहे.

(२) हे खरे नाही. प्रकल्पाचे एकूण स्वरुप पुढीलप्रमाणे आहे :-

१) ५ डिजीटल मायक्रोस्कोपव्दारे गडचिरोली, चंद्रपूर, रायगड व ठाणे या जिल्हयांतील ग्रामीण रुग्णालय व प्राथमिक आरोग्य केंद्र येथे मलेरियाची तपासणी तसेच उरो रुग्णालय पुणे, टी.बी. रुग्णालय नागपूर व टी.बी. रुग्णालय बुलढाणा येथे क्षयरोग तपासणीचा प्रकल्प.

२) M/s. Chiron X Gurgaon यांचेव्दारे जिल्हा रुग्णालय पुणे, सातारा, सिंधुदुर्ग, उस्मानाबाद, नंदुरबार, नाशिक, अकोला व नागपूर येथील २.५ लाख रुग्णाच्या डोळयांचे पटल (Retina) तपासणी झाली.

३) Bempu Health Pvt. Ltd. यांचेकडून उपजिल्हा रुग्णालय जव्हार येथील विशेष नवजात काळजी कक्षातून डिस्चार्ज झालेल्या बालकांना ५० Bempu उपकरणे उपलब्ध करुन दिल्याने ४ महिन्यात २०० नवजात बालकांचे सर्वेक्षण झाले.

४) Bodhi Health Foundation यांचेव्दारे बोधी ॲप असलेले ९ Android tablet पुरवठा तसेच प्रशिक्षिण याबाबत प्रस्ताव अंतिम टप्प्यात.

५) M/s Ayu Devices Pvt. Ltd, Mumbai यांचेकडून सांगली, नंदुरबार व नांदेड या जिल्हयांतील आरबीएसके पथकातील वैद्यकीय अधिकाऱ्यांना १०० Smart Stethoscope वितरित झाले.

६) M/s Niramai Health Analytics Pvt. Ltd, Bangalore यांचेकडून जिल्हा रुग्णालय पुणे येथे १,००८ महिलांच्या स्तनाच्या कर्करोगाची तपासणी Thermal Sensor व्दारे करण्यात आली.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**श्री.राजेंद्र भागवत**
**सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.